*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

## Unit 5

# RATIONALISM

# प्रज्ञावाद

1.1: देकार्त : प्रज्ञावादी पध्दती, स्पष्ट आणि विवक्त कल्पना, आत्मा, विवेकी सत्ये आणि वास्तव सत्ये.
1.2: स्पिनोझा : द्रव्य सिध्दान्त - गुण आणि रिती, सर्वेश्वरवाद / निरीश्वरवाद.
1.3: लायब्नीझ : मोनाडवाद, ईश्वर, विवेकी सत्ये आणि वास्तव सत्ये.



### प्रस्तावना

पाश्चात्य तत्वज्ञानात दोन मुख्य प्रवाह आहेत.

1. बुध्दीवाद / प्रज्ञावाद (Rationalism) 2. अनुभववाद (Empiricism)

बुध्दीवाद देकार्तपासून सुरु होतो तर अनुभववाद जॉन लॉकपासून सुरु होतो. देकार्तनंतर स्पिनोझा आणि लायब्निझ यांनी बुध्दीवादी परंपरा चालविली.लॉकपासून सुरु झालेला अनुभववाद बर्क्ले आणि ह्यूम यांनी परिपक्व केला. आपण देकार्तचा बुध्दीवाद पाहू.

## देकार्तचा प्रज्ञावाद

रेने देकार्त (1596 ते 1650) हा फ्रेंच तत्त्वज्ञ आणि कुशाग्र गणितज्ञ होता.त्याने तत्त्वज्ञानातील बुध्दिवादाचा पाया घातला.बुध्दिवाद म्हणजे आपल्याला जगाचे,मन,आत्मा,ईश्वर इत्यादी ज्ञानाच्या विषयांचे ज्ञान केवळ आपल्या पंच ज्ञानेंद्रियांनी न होता मुख्यत: बुध्दिच्या मार्फत सुसंगत तार्किक विचारातूनच होते असे सांगणारा विचार होय. ज्ञानाचे साधन म्हणून बुध्दी किंवा विचारशक्ती हाच एकमेव मार्ग आहे, असे सांगणारा देकार्त हाच पहिला तत्वज्ञ होता.म्हणून त्यास *बुध्दीप्रामाण्यवादाचा जनक* असे म्हटले जाते. बुध्दिला देकार्त *'ववेकशक्ति'* म्हणतो.

ज्ञानाच्या क्षेत्रात देकार्तने भावना,अनुभव किंवा परंपरा यांना महत्व न देता बुध्दिला महत्व दिले. ही मोठी वैचारिक क्रांती होती.देकार्तपर्यंतचे जग परंपरिक समजले जाते.देकार्तने विचार करणारी शक्ती या अर्थाने बुध्दिला प्राधान्य दिले. ही आधुनिक बाब होती.त्यामुळे देकार्तपासून पाश्चात्य जगात आधुनिकता सुरु झाली, असे म्हंटले जाते.देकार्तने भूमिती,गणित, खगोलशास्त्र,शरीरशास्त्र,मानसशास्त्र,भौतिकशास्त्र आणि तत्त्वज्ञान या सर्व विषयांना अतिशय महत्वाची व मूलगामी दिशा दिली.त्याने मुख्यत:तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोन जगाला दिला.म्हणून देकार्तला ***'आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक' (The Father of Modern Philosophy )*** अथवा ***आधुनिकतेचा जनक (The Father of Modernity )*** असे म्हणतात.

ज्ञान केवळ रुढी,परंपरा व धर्मग्रंथांमार्फत मिळते,ते ईश्वर देतो असा समज देकार्तपूर्वीच्या काळात होता.माणसाच्या विवेकशक्तिला महत्व तेंव्हा नव्हते.देकार्तच्या मते धर्मग्रंथांपेक्षा माणसाची केवळ विवेकशक्तिच सत्यज्ञान देते.देकार्तच्या मते ज्ञान नेहमी सत्यच असते.देकार्त गणितज्ञ असल्याने गणितात जसे सर्व ज्ञान नि:संदिग्ध आणि सुस्पष्ट (clear and evident) व निश्चितच (definite) असते तसे आपले सर्व ज्ञान असावे,असे त्याचे मत

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



होते.एका अर्थाने देकार्तने तत्त्वज्ञानात गणिती ज्ञानाची पध्दती आणली. गणितासारखेच तत्त्वज्ञान हे काटेकोर असावे, ही त्याची अपेक्षा होती.

René Descartes
31 March 1596 – 11 February 1650)
a French philosopher,
mathematician.
He has been dubbed the
'Father of Modern Philosophy'



देकार्तने लिहिलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे :-

1. *Meditations on first Philosophy*
2. *Meditations*
3. *Principles of Philosophy*
4. *Immortality of Soul*

देकार्त बुध्दीवाद समजावून घेण्यासाठी त्याची तत्वज्ञानाची संकल्पना पाहिली पाहिजे ती पुढीलप्रमाणे :-

## देकार्तची तत्वज्ञानाची संकल्पना

देकार्तच्या मते, तत्वज्ञान हे एखाद्या वृक्षासारखे असते.त्याची मुळे म्हणजे सत्तामींमासा आहे.त्याचा बुंधा म्हणजे पदार्थविज्ञान आणि त्यातून निघणा-या विविध शाखा म्हणजे विविध प्रकारची सामाजिक आणि नैसर्गिक शास्त्रे होय. त्यात प्रामुख्याने वैद्यक, नीतीशास्त्र याचा समोवश होतो.

तत्वमींमासेच्या क्षेत्रात ईश्वराचे गुणांची चर्चा होते.साहजिकच अमरतत्व आणि मनाची संकल्पना यांचा त्यात समावेश होतो. जग व जगाचे विविध घटक यांचा अभ्यास म्हणजे पदार्थ विज्ञान.नंतर ज्ञानाचा सर्वश्रेष्ठ प्रकार म्हणजे माणसाविषयीचे ज्ञान ! यात नीती ही सर्वश्रेष्ठ असून इतर सामाजिक आणि नैसर्गिक शास्त्रे दुय्यम असतात.

देकार्तने पाश्चात्य तत्वज्ञानाला, एकूण ज्ञान क्षेत्राला दिलेली महत्वाची देणगी म्हणजे शरीर, आत्मा व मन यांत त्याने केलेला सूक्ष्म फरक.देकार्तच्या पूर्वी मन, आणि आत्मा यांना एकच समजले जात होते.देकार्तने मात्र, मन आणि आत्मा यांच्या स्पष्ट फरक केला.ही दोन्ही अमूर्त द्रव्ये शरीर या मूर्त द्रव्यात राहतात.असे त्याने दाखवून दिले.देकार्तने केलेल्या फरकामूळे शरीराचे शरीरशास्त्र, मनाचे मानसशास्त्र आणि आत्म्याचे अध्यात्मशास्त्र अशी तीन नवी ज्ञानक्षेत्रे विकसित झाली. देकार्तच्या पूर्वी या संगळयांची सरमिसळ असल्याने गोंधळ होत होता. देकार्तने हा सूक्ष्म फरक करुन बुध्दिवादाची मूहर्तमेढ रुढविली.देकार्तचा बुध्दीवाद समजावून घेण्यासाठी आपण देकार्तपुढील तात्विक समस्येचे स्वरुप पाहू.

## देकार्तपुढील तात्विक समस्या

देकार्त पूर्वीचे तत्वज्ञान चर्चवादी, बायबलवादी किंवा धर्मवादी प्रभावामुळे बुध्दीला खूप मर्यादा येत होत्या. बायबल खराखरचं ॲरिस्टॉटलचा प्रभाव चर्चवर होता. त्यामुळे साहजिकच गेली हजार वर्षे कोणतेही नवीन तत्वज्ञान निर्माण होऊ शकत नव्हते. बायबल आणि ॲरिस्टॉटल या दोनचं गोष्टी अंतिम सत्य समजल्या जात होत्या.बुध्दीची कार्ये, विचार बंद पडलेला होता.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



देकार्तच्या मते, या चर्चवादी परंपरेने मानवी ज्ञानाचा व तत्वज्ञानाचा विकासच बंद केला. आणि एक भ्रामक सत्ताशास्त्र निर्माण केले. सगळी जनता त्यामुळे फसली. त्याच्या मते, तत्वज्ञान हे व्यावहारिक दृष्ट्या उपयोगी असले पाहिजे.मानवी जीवनसाठी, आरोग्याच्या रक्षणासाठी सर्व कल्पनांच्यासाठी ज्या-ज्या ज्ञानाची गरज असते, त्या सर्वांचे ज्ञान म्हणजे तत्वज्ञान.एखादी संस्कृती जेवढया प्रमाणात तत्वज्ञानाला महत्व देते. तेवढया प्रमाणात त्या संस्कृतीचा दर्जा वाढतो.कोणत्याही राष्ट्राला तत्वज्ञानापेक्षा अधिक महत्वाचे असे काहीही असू शकत नाही.तत्वज्ञानाचे मधूर फळ केवळ नीतीच्या स्वरुपातचं प्राप्त होऊ शकते. याचाच अर्थ त्या देशाचे नागरिक जितके नीतिमान असतात तितका तो देश तात्वीक दृष्ट्या प्रगती करु शकतो. चर्चने मात्र कोणतीही नवी नीती विकसितचं होवू दिली नाही. म्हणून देकार्त चर्चची सत्ताा नाकारतो.

तत्वज्ञ असण्याबरोबरच देकार्त गणितीही होता.गणितातील ज्ञान अत्यंत स्पष्ट आणि नि:संदिग्ध असते. उदा :- 2+2=4 या गणिती सूत्रात काहीही अस्पष्ट आणि संदिग्ध असे नाही. असे ज्ञान तत्वज्ञानात कसे प्राप्त होईल, ही देकार्तची पूढची तात्विक समस्या होती. थोडक्यात देकार्तच्या मते,

1) *पारंपारिक शब्दप्रामाण्य (बायबल व ॲरिस्टॉटल) अविश्वसनीय आहे.*
2) *सत्यज्ञान सुस्पष्ट आणि निसंशय (Clear and evident) असले पाहिजे.*
3) *मानवी कल्पना सुस्पष्ट, सुविशिष्टये आणि स्वच्छपणे प्रतीत होणा-या असल्या पाहिजे.*

थोडक्यात, ज्याप्रमाणे गणितीज्ञान स्पष्ट आणि निसंशय असते. त्याप्रमाणे तत्वज्ञानाचे ज्ञान कसे मिळेल ही देकार्तपुढची तत्वज्ञानात्मक समस्या होती. तत्वज्ञान हा सत्यज्ञानाचा बोध असतो आणि सत्य ज्ञान नेहमी 'सुस्पष्ट आणि नि:संदिग्ध' असले पाहिजे.

ते कसे मिळेल ? त्या ज्ञानाचा मार्ग कोणता ? हा मार्ग एकच आणि तो म्हणजे मानवाची बुध्दी.म्हणूनच तो बुध्दीला प्राधान्य देतो.

## विवेकी सत्ये आणि वास्तव सत्ये

## देकार्तची सत्यज्ञानाची संकल्पना

1. प्रत्येकाने स्वत:चे अनुभव व निरीक्षण करुन विवेकाने विचार करावा.मग सत्य शोधावे.कुणाचीही तयार मते घेवू नयेत.
2. स्वत:च्या विवेकशक्तिला पटल्याशिवाय कोणतेही ज्ञान सत्य म्हणून स्वीकारु नये.इतर व्यक्ति,धर्मग्रंथ,धर्मसंस्था,परंपरा,संकेत,रुढी,चालीरिती या साऱ्या गोष्टी आपली दिशाभूल करतात.या साऱ्यांचे म्हणणे सत्य म्हणून मान्य केल्यास आपली विचारशक्ति नष्ट होते.
3. ज्यास आपण ज्ञान म्हणतो ते नेहमी नि:संदिग्ध आणि सुस्पष्ट (clear and evident) व निश्चितच (definite) असते.हेच सत्यज्ञान होय.हे तीन ज्ञानाचे निकष आहेत.
4. जर एखाद्या ज्ञानाविषयी संशय निर्माण होत असेल तर ते ज्ञान सत्य नसते.संशय निर्माण होणे म्हणजेच ते ज्ञान सत्य नसणे.
5. आपल्याला सुचणाऱ्या कल्पना नेहमी नि:संदिग्ध व विशिष्ट स्वरुपाच्याच असल्या पाहिजेत.उगाच सुचल्या म्हणून कोणत्याही कल्पना स्वीकारु नयेत.या सुचलेल्या कल्पना सत्यज्ञानाच्या वरील निकषांनानुसारच नि:संदिग्ध व विशिष्ट स्वरुपाच्याच असल्या पाहिजेत.

सत्यज्ञानाच्या या संकल्पनेनुसार देकार्त 'माणसाने विचार कसा करावा' आणि 'सत्यज्ञान कसे शोधावे' हे सांगण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करतो.ही तत्त्वे कोणत्याही व्यक्तिला कधीही उपयोगी पडू शकतात.ती अशी:

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## सत्यशोधनाची मार्गदर्शक तत्त्वे

1. कोणतेही विधान स्वत:ला स्पष्टपणे समजले आणि सत्य म्हणून सिध्द करता आले तरच ते स्वीकारावे अन्यथा ते स्वीकारु नये.
2. कोणतीही समस्या सोडविण्यासाठी प्रथम तिचे जास्तीत जास्त लहान लहान भाग करावेत.
3. स्वत:ला सोपे वाटेल त्या भागापासून कठिण भागाकडे जावे.
4. हे करीत असताना 'आपण काहीही वगळत नाही' अशी खात्री करुन घ्यावी.

ही तत्त्वे अवलंबल्यास आपणांस निश्चितरित्या सत्य सापडू शकते, असे देकार्त म्हणतो.पण एखादी गोष्ट सत्य कशी मानावी ? कोणत्या निकषावर तिची सत्यता तपासावी ? यावर देकार्त म्हणतो की जर त्या विधानाच्या किंवा गोष्टीच्या सत्यतेविषयी शंका आली,संशय आला की ती सत्य नाही, असेच समजावे.संशय येणे याचा अर्थच ज्ञान सत्य नसणे. त्याची संशयाची पध्दती पुढीलप्रमाणे :

## देकार्तची संशयाची पध्दती: संशयवाद : प्रज्ञावादी पध्दती

देकार्तच्या मते सत्यज्ञानाची संकल्पना पाहाता एखादे विधान करताक्षणी ते विधान सुस्पष्ट,नि:संदिग्ध व निश्चित आहे असे आढळले तरच ते सत्य असतेच.पण संशय आला तर ते सत्य नाही,असेच समजले पाहिजे. उदाहरणार्थ हे दृश्य जग खरेच अस्तित्वात आहे का ? या जगाचे व जगातील माणसांचे, पशुपक्षांचे ज्ञान मला माझ्या ज्ञानेंद्रियांमार्फत होते, हे खरे. पण *ज्ञानेंद्रिये मला फसवतात* असाही अनुभव मला येतोच.उदाहरणार्थ काठी मुळात सरळ असताना ती पाण्यात बुडविली की वाकडी दिसते,दोरीच्या जागी साप दिसतो. याचा अर्थ *माझी इंद्रीये मला निश्चित ज्ञान देत नाहीत.*

ज्या जगात मी राहातो त्या जगाच्या अस्तित्वावर आणि जगातील माणसांच्या अस्तित्वावर माझा लहानपणापासून विश्वास आहे हे खरे.पण ज्ञानेनद्रीये फसवतात असे आढळल्याने हे जग व माणसे खरीच अस्तित्वात आहे का ? असा संशय मी घेवू शकतो.जसे मला स्वप्नात जे दिसते ते त्या क्षणाला खरेच वाटत असते,पण जागे झालो की ते खोटे,भासात्मक होते याची जाणीव होते.तसे एखाद्या राक्षसानेच माझ्या डोक्यात जगाची सत्यता भरली असेल किंबहुना त्या राक्षसालाच स्वप्न पडले असून सारे जग,सारी माणसे व मी सुध्दा त्याच्या स्वप्नाचा भाग आहोत; त्याने डोळे उघडले की माझे अस्तित्व संपलेच की ! याचा अर्थ हे जग,माणसे काही सत्य नाहीत ! ज्याअर्थी मला त्यांचा संशय येतो त्याअर्थी ते सत्य नाहीत.

जग,जगातील माणसांप्रमाणे मला ईश्वराचाही संशय येतो.तो खराच आहे की नाही,असा संशय मी घेवू शकतो.आणि संशय येतो याचा अर्थच ईश्वराचे ज्ञान सत्य नाही. आता ईश्वरच संशयास्पद आहे तर त्याच्या अस्तित्वाचा दावा करणारे धर्मग्रंथही सत्य असतील कशावरुन ? त्यांचा संशय येतो, याचा अर्थच ते सत्य नाहीत.अशा रितीन देकार्त ज्ञानाचे विषय असणाऱ्या श्रध्दा,वस्तू या विषयी संशय घेतो.

## 'आत्मा ' संकल्पना : मग नि:संशय असे काय आहे ?

तर देकार्तच्या मते 'संशय घेणे' या घटनेबद्दल मात्र मी कसलाही संशय घेवू शकत नाही.ज्या अर्थी संशय घेतला जातो त्याअर्थी संशय घेणाराही असला पाहिजेच ! संशय घेणाऱ्याविषयी संशय घेता येत नाही.तो असतोच. थोडक्यात संशय हा संशय घेणाऱ्याचे अस्तित्व सिध्द करतो. हा संशय घेणारा मी आहे. आता देकार्तच्या मते संशय घेणे म्हणजे विचार करणे.म्हणून मी संशय घेतो म्हणजेच मी विचार करतो.याचाच अर्थ 'मी विचार करतो म्हणून मी आहे ! ' **(I think therefore I am – Cogito ergo sum)** **.मी संशय घेतो म्हणून मी आहे.** **(I doubt**

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

**therefore I am ).** संशय,विचार ही ज्ञानाची क्रिया आहे.विचार करणे = जाणणे होय.म्हणून ' मी जाणतो म्हणून मी आहे ! '

आता, हा ''मी'' कोण ? तर देकार्तच्या मते 'मी म्हणजे आत्मा'.विचार करण्याची क्षमता केवळ आत्म्यातच असते. आत्मा जर नसता तर तो विचार करु शकला नसता.पण तो विचार करतो तर तो अस्तित्वातही असला पाहिजे.अशा रितीने आत्म्याचे अस्तित्व सिध्द होते.स्वत:ची जाणीव असणे म्हणजे मी.

मला जशी जाणीव आहे, तशीच जाणीव इतर माणसांनाही आहे.त्यामुळे इतर माणसेही विचार करतात.त्यामुळे तीही माणसे अस्तित्वात आहेत.त्यांनाही आत्मा आहे.म्हणून त्यांना व त्यांच्या आत्म्यांनाही अस्तित्व आहे.



आता, हा आत्मा कुणी निर्माण केला? त्याला निर्माण करणारा माझ्याशिवाय दुसराच कुणीतरी असला पाहिजे. कारण मी काही स्वत:ला निर्माण करु शकत नाही.हा कुणीतरी म्हणजे ईश्वर ! ईश्वर जर नसता तर मी नसतो.पण मी आहे याचा अर्थ माझा निर्माता ईश्वर अस्तित्वात आहे.ईश्वर 'मी' ला म्हणजे आत्म्याला आणि माझ्या शरीरालाही निर्माण करतो तसा तो इतरांच्या आत्म्यांना आणि शरीरांनाही निर्माण करतो.म्हणून ईश्वरही अस्तित्वात असला पाहिजे.ईश्वर हे विचार करणारे सर्वश्रेष्ठ अस्तित्व आहे.

अशा रितीने देकार्त संशयाचे हत्यार वापरुन जगाच्या, इतरांच्या व ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका घेतो.पण विचार करण्याच्या मार्गानेच सर्वांचे अस्तित्व स्वीकारतो.देकार्त आत्मा, ईश्वर मानणारा होता. ईश्वराने जग निर्माण केले.या जगाची रचना एखाद्या घड्याळाप्रमाणे यांत्रिक आहे,असे तो समजत असे.

## परीक्षण

देकार्तच्या मते मानवी व्यक्तित्व शरीर आणि मन या दोन घटकांनी बनलेले आहे.विस्तार हा शरीराच गुणधर्म आहे तर जाणीव हा मनाचा गुणधर्म आहे.जाणण्याची प्रक्रिया मनाकडूनच घडते.ती घडते शरीरात पण मनच केवळ जाणते.शरीर जाणू शकत नाही.मनाच्या दोन शक्ति आहेत :

(1) अंत:प्रज्ञा (Intution)

(2) निगमनात्मकता (Deductive reasoning)

या दोन कार्यशक्तिंच्या आधारेच माणसाला यथार्थ ज्ञान अथवा जाणीव होवू शकते. 2 + 2 = 4 हे ज्ञान पंचज्ञानेद्रीयांनी म्हणजे शरीराने होत नाही तर फक्त मनानेच होते.म्हणजे बुध्दीने,अंत:प्रज्ञेनेच होते.असे अंत:प्रज्ञात्मक ज्ञान हा जणू काही साक्षात्कारच असतो, असे देकार्त म्हणतो.हा भाग समजणे कठीण पण अशक्य नाही.

निगमनात्मकता म्हणजे सामान्याकडून विशिष्टाकडे जाणे.सत्य विधानाच्या आधारे दुसरे मिळणारे विधान सत्यच असते.तेथे संशयाला जागा नसते.मी विचार करतो म्हणून मी आहे, हे अंत:प्रज्ञात्म निगमन आहे. पण तो तर्क नाही, तर साक्षात्कार आहे ! असे देकार्तचे म्हणणे आहे.

## गणिती पध्दतीचे तत्त्वज्ञान

देकार्त गणिती होता. गणितात निश्चित, नि:संदिग्ध सत्ये असतात.2+2 = 4 हे इतके नि:संशय सत्य आहे की त्याविषयी कसलाच संशय अशक्य आहे.गणितातील 2 हे विधानातील सत्य स्वंयसिध्द आहे.काटकोनाची बेरीज 180 अंश होते, हे असेच विधान स्वंयसिध्द सत्य विधान आहे.तशी सत्ये तत्त्वज्ञानात नसतात, पण ती असावीत, अशी देकार्तची धारणा होती.त्यामुळे गणिती पध्दतीवर तत्त्वज्ञान रचले जावे, असे त्याचे म्हणणे होते.

गणिती पध्दत म्हणजे स्वंयसिध्द विधानातील सत्य तत्त्वांपासून मिळणारी दुसरी स्वयंसिध्द सत्ये (किंवा स्वयंसिध्द सत्य विधाने ) निष्कर्ष रूपात मिळविणे.असा निष्कर्ष निगमानाने मिळतो.आणि स्वयंसिध्दता अंत:प्रज्ञेने

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

जाणवते, असे देकार्त म्हणतो.हीच पध्दत तत्त्वचिंतनात उपयोगात आणल्यास तत्त्वज्ञानही गणिताच्या दर्जाला प्रतिष्ठित होईल असा त्याचा विश्वास होता.गणिती पध्दत वापरुनच त्याचे संशयाची पध्दती रचली.

## सामान्य संशय व तत्वज्ञानात्मक संशय

साधारणत: आपण विविध गोष्टींबददल संशय घेतो.एखादयाची प्रवृत्तीसुध्दा संशयनीय असते. पण सर्वसामान्यांचा संशय हा सत्याकडे जातोचं असे नाही.तो पुन्हा नव्या संशयाकडे किंवा गोंधळाकडे जाऊ शकतो.या संशयातून देकार्तचा संशय अधिक उच्च दर्जाचा आणि केवळ सत्याकडेच जाणारा तत्वज्ञानात्मक संशय आहे.

सर्वसामान्य संशय घेण्याच्या प्रवृत्तीला देकार्त तत्वज्ञानात्मक दर्जा देतो. म्हणजे त्याचा संशय केवळ सत्याकडे जाणारा आहे.संशयाने मिळणारे सत्य त्याच्या मते, गणितीसारखे स्पष्ट आणि नि:संशय असे, संशयातित सत्य असते.त्याच्या मते संशय हीच तत्वज्ञानाची पध्दती आहे. असा फरक आपणांस सामान्य संबंध आणि तत्वज्ञानात्मक संशय यांत सांगता येईल.

देकार्तचा संशय हा सामान्य माणसाचा इतरांवर अविश्वास दाखवणारा व्यावहारिक संशय नाही.तो संशय *तत्वज्ञानात्मक संशय* (Philosophical doubt) आहे.तो संशय घेण्याकरिता संशय घ्यावयाचा असा नसून ' सत्यज्ञानाकरिता संशय' असा आहे. संशयाची ही पध्दती विचार नष्ट करणारी नाही तर विचार निर्माण करणारी पध्दती आहे. ती देकार्तने दिली म्हणून तिला ***'कार्तेशियन पध्दती' (Cartesian[1] Doubt)*** म्हणतात. ती संशय वापरुन केली गेली म्हणून तिला ***'संशयाची पध्दती' (The Method of Doubt)*** म्हणतात.हा देकार्तचा संशयवाद आहे.पण तो विघातक नसून विधायक आहे. तो ज्ञान नष्ट करणारा नाही तर निश्चित ज्ञन देणारा आहे. देकार्तने हे त्याचे सारे तत्त्वज्ञान *चिंतने' (Meditions)* या ग्रंथात मांडले.

## देकार्तने पाश्चात्य तत्वज्ञानास दिलेले योगदान

### 1. विवेकवादाचा पाया

पाश्चात्य तत्वज्ञानात आणि एकूणचं पाश्चात्य जीवनशैलीत 'बुध्दीला महत्व देणा-या देकार्त हा पहिला तत्वज्ञ होता. देकार्त पूर्वकालात ज्ञान नावाची गोष्ट ही फकत धर्मगुरु, ॲरिस्टॉटल आणि बायबल यांच्याकडूनचं येत असे.तेथे बुध्दीचा प्रश्न नव्हताच. बुध्दी व बुध्दीगम्य सत्य यांनाच अनुक्रमे ज्ञानाचे मार्ग व ज्ञान असा दर्जा देण्यात आला. देकार्त हा पाश्चात्य तत्वज्ञानातील पहिला तत्वज्ञ होय. बुध्दीच्याचं साह्याने तो सत्य ज्ञानाचे निकषही सांगतो. हा पहिला मुददा.

### 2. बंडखोरी

दुसरा मुददा असा की, देकार्तने धर्मगुरु आणि ॲरिस्टॉटल यांचे प्राबल्य नाकारुन एक प्रकारे बंड केले (जसे भारतात ज्ञानेश्वरांनी केले). हे बंड या दोघांच्या एकाधिकार शाहीविरुध्द बुध्दीला महत्व देणे म्हणजे व्यक्तीला महत्व देणे होते. व्यक्ती आधी चर्चप्रणित श्रध्देची गुलाम होती. पण बुध्दी प्रत्येक व्यक्तीकडे असते. देकार्त त्या बुध्दीलाच जागे होण्याचे आव्हान करतो.आणि सर्वसामान्य व्यक्तीला तत्वचिंतन करण्यास उदयुक्त करतो. श्रध्देच्या गुलामगिरीतून व्यक्तीची व बुध्दीची मुक्तता करतो.

### 3. मार्गदर्शक तत्वे बुध्दीप्राप्तंच

तिसरे वैशिष्टये असे की मार्गदर्शक तत्वे बुध्दी मार्फतच प्राप्त होणारी असतात. बुध्दीनेच हा शोध लावलेला असून ते कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला सापडू शकतात, असे सांगून देकार्त धर्मगुरुपेक्षा कोणत्याही

[1] *Cartesian* हा शब्द *Descartes* या नावापासून बनतो. *Descarte* हे नाव लॅटीन आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

सर्वसामान्य व्यक्तीला अधिक महत्व देतो. धर्मगुरुसाठीच पोथीबंद असलेले तत्वज्ञान सर्वसामान्य लोकांसाठी खुले करतो.

### 4. संशयाला तत्वज्ञानाचा दर्जा

चौथे वैशिष्टय असे की, देकार्तने गणितीपध्दती आदर्श मानली.तिचंच रुपांतर तत्वज्ञानाच्या पध्दतीत केले. तिला तो संशयाची पध्दती म्हणतो.संशय येण्याच्या साधारण मानवी प्रवृत्तीला नीटनेटके वैज्ञानिक व गणिती स्वरुप देऊन संशयाला तो तत्वज्ञानाचा दर्जा देतो.संशयाची पध्दती रुढ करणारा देकार्त हा पहिला तत्वज्ञ धर्मगुरु, त्यांच्या श्रध्दा, धर्मग्रंथ व ज्ञानग्रंथ या सर्वांच्या सत्यतेविषयी तो संशय व्यक्त करतो. आणि सत्याकडे बुध्दीच्या प्रकाशात मार्गक्रमण करतो.

### 5. धर्म, विज्ञान व तत्वज्ञान

पाचवे वैशिष्ट्य असे की, धर्म, चर्च व ॲरिस्टॉटलचे बंदिस्त तत्वज्ञान यांच्यापासून तत्वज्ञानाला तो तोडतो आणि विज्ञानाच्या जवळ आणतो. वैज्ञानिक पध्दतीने विचार करुन तत्वज्ञानाला तो चिकीत्सक आणि बुध्दिप्रामाण्यवादी बनवितो. तत्वज्ञान व विज्ञान यांच्यात तो स्नेह निर्माण करतो. धर्मगुरुंनी मात्र विज्ञानाला विरोध केलेला होता. विज्ञान-वैज्ञानिक आणि धर्मगुरु, धर्मसंस्था व धर्मतत्वे यांच्यात त्यावेळी केवळ मतभेद होते असे नव्हे तर टोकाचे शत्रूत्वही होते.

देकार्तने धर्म, विज्ञान व तत्वज्ञान या तिघांचे क्षेत्रे, मार्ग वेगळे केले. एकाचा दूस-यावर परिणाम होऊन न देता प्रत्येकाने आपली स्वतंत्र प्रगती करावी असे तो ठरवून देतो. एवढेच नव्हे तर धर्मालाही तो वैज्ञानिक व तत्वज्ञानात्मक आधार देतो व स्वरुप देतो. देकार्तची ही कामगिरी इतकी मोठी ठरली की, त्यामुळेचं तर त्याला आधुनिक तत्वज्ञानाचा जनक असे म्हटले.

### 6. बुध्दीप्रामाण्यावादी ईश्वरशास्त्र

यातून निष्पन्न होणारे सहावे वैशिष्ट्य असे की, देकार्तने ईश्वरशास्त्रालासुध्दा बुध्दीप्रामाण्याचा दर्जा दिला.ईश्वर आणि विज्ञान यांच्यात सुसंवाद निर्माण केला. केवळ श्रदधेने नव्हे तर वैज्ञानिक पध्दतीने ईश्वराचे अस्तित्व सिध्द करता येते, असे त्याने दाखवून दिले.

ईश्वराबददल युक्तीवाद करीत बसण्याऐवजी त्याची उपासना करावी, असे तो सांगतो. ईश्वरशास्त्र तत्वज्ञानाच्यास पुढे जाते पण त्या दोघांचे भांडण नाही हे ही तो स्पष्ट करतो. म्हणून तर देकार्त ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांची सांगड घालू शकतो.

### 7. शरीर, मन आणि आत्मा यांच्यात स्पष्टपणे फरक

देकार्तचे सातवे वैशिष्टये असे की, त्याने शरीर, मन आणि आत्मा यांच्यात स्पष्टपणे फरक केला.मन आणि आत्मा यांच्यात सूक्ष्म व स्पष्ट फरक करणारा देकार्त पहिला तत्वज्ञ होता.शरीर व मन विषयक आंतरक्रियावाद मांडून त्याने विलक्षण क्रांती केली.त्यांच्यात द्वैत उभे केले.त्या द्वैतामुळे मानसशास्त्र, शरीरशास्त्र व अध्यात्मशास्त्र हेही स्वतंत्र झाले. शरीर, विज्ञान प्रगत झाले. वैद्यकीय विज्ञान सिध्द झाले.

### 8. विश्वाविषयीचा त्याने यांत्रिकवाद

आठवे वैशिष्टये असे की, विश्वाविषयीचा त्याने यांत्रिकवाद मांडला. विश्वाची रचना व व्यापार यांत्रिक पध्दतीने चालतात.हे वैज्ञानिक सत्य देकार्तनेच प्रथम तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आणले.विज्ञानाचे नियम अपरिवर्तनीय, अनुउल्लंघनीय, एकरुप व यांत्रिक असतात. हे देकार्तने सिध्द केले. देकार्तपासून विज्ञान सुव्यवस्थित स्वरुपाला आले. या विश्वयंत्राचाच भाग असलेला प्रत्येक घटकसुध्दा यंत्ररुपच आहे ते देकार्त सांगतो.माणूस हाही एक

संजीवयंत्र आहे पण माणूस बुध्दी मन, आत्मा असलेले सर्वश्रेष्ठ यंत्र आहे असे देकार्त म्हणतो.मनाला तो *'यंत्रातील भूत '* *(The Ghost in the machine )* असे म्हणतो.

**9. फ्रेंच या सर्वसामान्यांच्या भाषेत लेखन**

त्याचे नववे वैशिष्ट्य म्हणजे, तत्कालीन प्रथेनुसार लॅटीन या विद्वानांच्या भाषेत लिहीण्याऐवजी देकार्तने फ्रेंच या सर्वसामान्यांच्या मातृभाषेत साध्या, सरळ व हृदयाला भिडणा-या पध्दतीने लेखन केले आहे. असे लेखन करणारा देकार्त हा पहिला तत्वज्ञ होता.जसे भारतात संस्कृतऐवजी स्वभाषेत लिहिणारे ज्ञानेश्वर व बसवेश्वर हे पहिले तत्वज्ञ कवी होते.रील विविध कारणांमुळे देकार्तचे स्थान सर्वज्ञानक्षेत्रात आणि तत्वज्ञानाच्या क्षेत्रात अग्रणीय आहे. म्हणून देकार्तला ***आधुनिक पाश्चात्य तत्वज्ञानाचा जनक*** म्हणतात.

-----------------------------------------------

## बेनेडिक्ट स्पिनोझा

बेनेडिक्ट स्पिनोझा (Benedict - Spinoza - Spinoza: 1632-1677) हा कदाचित् नवजीवनाचा सर्वात महत्वाचा तत्वज्ञ आहे, पण त्याच्या समकालिनांनी त्याला फारशी मान्यता दिलेली नव्हती.सतराव्या शतकातील तो महत्वाचा मध्यवर्ती विचारवंत होता. त्याचे व्यक्तिमत्व व्यापक व समन्वयी होते.त्यात एक प्रकारचा गूढवाद डोकावतो.गूढवादी व निसर्गवादी, सैध्दान्तिक व व्यावहारिक अशा विरुध्द व संघर्षमय प्रवृत्तींचा स्पिनोझात सुसंवाद व समन्वय झालेला दिसतो. स्पिनोझाच्या व्यक्तिमत्वात फार मोठा पुरुषार्थ, विक्रम, शौर्य, दिमाख असे काही दिसत नसूनही सोज्ज्वळता, नाजुकता, सखोलता व व्यापकता, नम्रता व खंबीरता, भेदक बुध्दिप्रवणता, भावनांची समृध्दी, शुध्दी व सर्वकषता इत्यादी अनेक गुणांचे सुमधुर व विरळ संमिश्रण झालेले पाहावयास मिळते.

बारुश (Baruch) स्पिनोझाचा जन्म 24 नोव्हेंबर 1632 मध्ये ॲमस्टरडॅम येथे एका ज्यू कुटुंबात झाला. तो पोर्तुगीज ज्यू होता व त्याचे कुटुंब सोहाव्या शतकाच्या शेवटी हॉलंडमध्ये देशांतर करुन गेले होते.

### ग्रंथरचना :

आपल्या ग्रंथरचनेस स्पिनोझाने कार्तेशिअन तत्वज्ञान विशद करण्यापासून सुरुवात केली. ही रचना त्याने मुख्यत: अल्बर्ट-द बरोसाठी केली होती. कार्तेशिअनवादाकडे तो ज्या वैशिष्टयपूर्ण रीतीने पाहातो तीच त्याच्या तत्वज्ञानाची जणू प्रस्तावना आहे.तेव्हापासून त्याने त्याचा मूळ ग्रंथ Ethica यावर आपले सर्व लक्ष केंद्रित केले. तो आपले हस्तलिखित सहसा कोणालाही दाखवीत नसे. त्याचा आशय सांगताना ज्यांना सांगावयाचे त्यांचे चारित्र्य, स्वभाव व परिस्थिती कशी आहे याची तो विशेष चौकशी करीत असे व सावधगिरी बाळगीत असे.उदरनिर्वाहासाठी तो चष्म्याची भिंगे तयार करण्याचा व्यवसाय करीत असे.

जनमानसाचे त्याला जे कटू अनुभव झाले होते त्यावरुन त्याने Ethicaहा ग्रंथ प्रसिध्द करण्याचे टाळले. एवढयावरच तो थांबला नाही तर हायडेलबर्ग विद्यापीठात त्याने तत्वज्ञानाच्या प्राध्यापकाचे अभ्यासन पत्करावे असे त्याला निमंत्रण आले असतानाही तेथे आपणास शिकविण्यास पुरेसे वैचारिक स्वातंत्र्य मिळण्याविषयी त्याला शंका वाटल्याने त्याने त्याचा स्वीकार केला नाही.त्याला असलेल्या फुफफुसाच्या विकाराने बरीच वर्षे त्याची प्रकृती बिघडत राहिली. त्याची फुफ्फुसे मुळातच दुर्बल होती.तशात भिंगे घासत असता उडणारे कण सतत श्वासाने त्याच्या फुपफुसात जात. अति शारीरिक व बौध्दिक श्रमाने तो झिजत गेला आणि क्षयाच्या विकाराने अवघ्या 44 व्या वर्षी 21 फेब्रुवारी 1677 ला त्याने या जगाचा निरोप घेतला. एकूण ज्या शांतीने, तृप्तीने व प्रसन्नतेने तो जीवन जगला त्याच शांतीने त्याने या जगाची यात्रा संपविली.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org,  9226563052*

## *Baruch de Spinoza*
*(November 24, 1632 – February 21, 1677)*
*Dutch Jewish philosopher*





स्वभाव :

प्रवृत्तीने स्पिनोझा प्रसिध्दी पराड्.मुख, विरागी, चिंतन व ध्यानांत मग्न असणारा असल्याने त्याने जागतिक  कीर्तीची, मानाची व सामाजिक मान्यतेची कधी हाव धरली नाही. तरीही त्या वेळी नुकत्याच स्थापन झालेल्या लंडनच्या रॉयल सोसायटीचा कार्यवाह ओल्डेनबर्ग, त्याच्या मार्फत रॉबर्ट बॉईल,  भाषाभ्यासक व्हॉस, व तत्वज्ञ लायब्निझ यांनी त्याच्या भेटी घेतल्या.  चौदाव्या लुईने त्याला निवृत्तिवेतन देण्याचेही ठरविले होते.  मात्र त्यासाठी स्पिनोझाने एक ग्रंथ आपणास अर्पण करावा अशी त्याने अट कळविली होती. पण कोणत्याही परिस्थितीत आपले वैचारिक स्वातंत्र्य गमावायचे नाही असा त्याने दृढ निर्धार केला असल्याने त्याने हायडेलबर्ग विद्यापीठातील प्राध्यापकाची जागा किंवा चौदाव्या लुईकडून मिळवावयाचे निवृत्तिवेतन यांचा स्वीकार करण्यास नकार दिला.  तो पैशांच्या व मानाच्या प्रलोभनाला कधीच बळी पडला नाही. याचे कारण तो एखाद्या विरक्त सन्याशासारखा अत्यंत साधे जीवन जगत असे.त्याच्या गरजा अत्यंत कमी असत.तो विषयोपभोगांविषयी उदासीन असल्याने त्याला फारच थोड्या वस्तूंची गरज लागत असे.  तशाच त्याची वृत्तीच समाधानाची व तृप्तीची होती.  सर्वांशी वागण्यात त्याची वृत्ती प्रसन्न, स्नेहाळ, सहानुभूतिपूर्ण व करुणेने ओतप्रोत भरलेली अशी असे. तो सर्वांना मित्र वाटे.  ज्यांना त्याचा जवळून परिचय होत असे ते त्याला आपला मित्र व मार्गदर्शक समजत.  हाव, वखवख, चित्ताची अशांती, अस्वस्थता, असंतुष्टता, यांपासून तो मनाने मुक्त होता. चश्म्याची भिंगे घासण्याचे साधे काम करुन स्वत: स्वाभिमानाने जगला.

## द्रव्य-गुण-विकार सिध्दान्त

विश्वाचे बुध्दिनिष्ठ व सुबध्द उपपादन करतांना मुक्तकल्पनावादी तत्वमीमांसकांनी अनेक तत्वांचा एका तत्वात संक्षेप करण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे.अनेकांचे एकाच्या साहाय्याने किंवा विविधतेचे एकतेच्या साहाय्याने उपपादन करण्यात विश्वातील असंख्य वस्तू व घटना यांचे अस्तित्व व स्वरुप केवळ एका कारणाने (Cause) निर्माण झालेले आहे असा कारण-कार्य संबंध प्रामुख्याने दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येत असतो.

स्पिनोझाने मात्र विश्वातील प्रचंड विविधता व अनेकता एकाच कारणातून निर्माण झालेली आहे असे दाखविण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला. तो अनंत आदिद्रव्याला (Substance) ईश्वर किंवा निसर्ग (Deus Sive Natura) म्हणतो.मात्र त्याला अभिप्रेत असलेला कारणसंबंध हा 'तार्किक लक्षिततेच्या' (Logical Imlication) स्वरुपाचा आहे.सर्व सान्त पदार्थ व्यक्ती व घटना एका अंतिम आधारतत्वापासून त्याने निगमित करुन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.अनेकांचा व विविधतेचा एकत्वाशी असणारा संबंध हा निगमित निष्कर्षाचा त्याच्या आधार विधानाशी असलेल्या संबंधासारखा आहे असे तो मानतो. ही तार्किक अनिवार्यता होय.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

विश्वातील सर्व विविधता अनेकता व भेदशीलता ही एकत्वापासून तार्किक अनिवार्यतेच्या पध्दतीने निष्पन्न होते, हे सिध्द करण्यासाठी तो भौमितिक पध्दतीचा अवलंब करतो. जेव्हा आपण एखादा पदार्थ, वस्तू, घटना किंवा व्यक्ती समजावून घेतो तेव्हा आपण तिचे कारण व कारणापासून तिची कशी उत्पत्ती होते हे समजावून घेत असतो. म्हणजे कार्याचे ज्ञान कारणाच्या ज्ञानावर अवलंबून असते व कार्याच्या ज्ञानात कारणाचे ज्ञान अपरिहार्यपणे अंतर्मूत असतेच. म्हणून जेव्हा आपण एखाद्या वस्तूचे किंवा घटनेचे उपपादन करीत असतो तेव्हा आपण तिचे कारण कोणते हे नक्की करीत असतो. या पध्दतीनेच स्पिनोझा द्रव्य (Substance) कल्पनेस येऊन पोहोचतो.

## द्रव्याची (Substance) व्याख्या



द्रव्याची (Substance) व्याख्या करताना स्पिनोझा म्हणतो की, 'द्रव्य म्हणजे ते असते की जे स्वत:च अस्तित्वात असते.ज्याची कल्पना केवळ स्वत:च्याच मार्फत करता येऊ शकते, म्हणजे त्याची कल्पना करण्यासाठी दुस-या कशाच्या कल्पनेची गरज लागत नाही, किंवा दुस-या कशाच्याही कल्पनेपासून त्याची कल्पना निष्पन्न होऊ शकत नाही.'

द्रव्य हे संपूर्णपणे स्वतंत्र व स्वावलंबी असते व त्याच्या अस्तित्वाला किंवा ज्ञानाला (बोधाला) स्वत:खेरीज इतर कशाचीही आवश्यकता लागत नाही.मात्र इतर कशाचीही कल्पना गृहित धरल्याशिवाय द्रव्याची कल्पना केवळ स्वत:व्यतिरिक्त इतर कोणत्याही बाह्य गोष्टीवर किंवा शक्तीवर अवलंबून नसते. त्याचे उपपादन स्वत:खेरीज इतर कशानेही होऊ शकत नाही. द्रव्याच्या व्याख्येनुसारच द्रव्य संपूर्णपणे स्वावलंबी, स्व-आधारित व स्वयंपूर्ण असते. ते स्वत:चे अस्तित्व व स्वत:चे गुण (Attributes) व विकार (Modes) यासाठी इतर कोणत्याही बाह्य गोष्टीवर किंवा कारणावर अवलंबून राहात नसते.

द्रव्याचे हे वर्णन केवळ त्याच्या व्याख्येनुसारच खरे ठरते असे नसून ते वास्तवात असलेल्या प्रत्यक्षतेचे किंवा सद्वस्तूचे (Reality) वर्णन आहे. म्हणजे द्रव्य अस्तित्वात आहे याविषयी स्पिनोझाला यत्किंचितही संशय वाटत नाही. द्रव्याचे अस्तित्व दिलेलेच असते. द्रव्याचा विचार करु लागल्यास त्यात त्याचे अस्तित्व अपरिहार्यपणे अस्तित्वात असतेच. म्हणजे द्रव्यविषयक विचार किंवा कल्पना आणि द्रव्याचे अस्तित्व या दोन भिन्न व विलग गोष्टी नसून त्या एकच होत, म्हणजे द्रव्याच्या सारात (Essence) त्याचे अस्तित्व (Existence) अपरिहार्यपणे सामावलेलेच असते.द्रव्याला अस्तित्व असल्याशिवाय त्याच्या स्वरुपाचा विचारच होऊ शकत नाही. हे इतके सर्वव्यापी असते की ते स्वत:मधून काहीही वगळू शकत नाही. म्हणजे द्रव्याचे अस्तित्व त्याच्या व्याख्येपासूनच निष्पन्न होते.

अस्तित्वात असणे हा त्याच्या स्वभावाचा सारभूत भाग आहे. जर द्रव्य हे संपूर्णपणे स्वतंत्र अस्तित्व असेल तर ते अनन्त, अमर्यादित (Infinite) असले पाहिजे.कारण ते जर अनन्त असेल तर स्वावलंबी किंवा स्वयंपूर्ण होऊ शकत नाही आणि असे द्रव्य फक्त एकच, एकमेव, एकमेवाद्वितीय असले पाहिजे, आणि ते असे नसेल तर त्याला इतरांच्या मर्यादा पडतील व त्याचे स्वातंत्र्य राहणार नाही, त्याचे स्वातंत्र्य नष्ट व अर्थविहीन होईल. जर द्रव्य अनन्त नसून सान्त (Finite) असेल तर त्याच स्वरुपाच्या इतर द्रव्याकडून ते मर्यादित होईल, म्हणजे त्याला तोच गुण असेल, पण एकच (तोच) गुण असणारी दोन किंवा अधिक द्रव्ये असू शकत नाहीत. कारण दोन किंवा अधिक द्रव्ये असली तर त्यांना एकमेकांपासून भिन्न म्हणून ओळखावे लागेल, याचाच अर्थ त्यांना वेगवेगळे गुण असावे लागतील. जर दोन द्रव्यांना तेच गुण असतील किंवा एकच गुण असेल तर त्यांचे 'सार' एकच असेल व असे असेल तर त्यांना परस्पराहून वेगळे असे 'दोन' समजण्याचे कारणच उरत नाही.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

जर एकच (तोच) गुण असलेली दोन किंवा अधिक द्रव्ये असू शकत नाहीत तर द्रव्य मर्यादित किंवा सान्त असू शकत नाही.म्हणून द्रव्य हे अनन्तच असेल.त्याचप्रमाणे इतर काहीही त्याच्या बाहेर असू शकत नाही व इतर कशाचाही त्याच्यावर परिणाम होऊ शकत नाही आणि इतर कोणताही बाह्य कारणाचा त्याच्यावर परिणाम होत असेल तर त्याचे ज्ञान केवळ त्याच्या स्वत:च्याच मार्फत होऊ शकते असे म्हणता येणार नाही. याचाच स्पष्ट अर्थ असा होतो की द्रव्याच्या स्पिनोझाने केलेल्या व्याख्येनुसार ते स्वरुपाने अनन्त किंवा अमर्याद असले पाहिजे.

द्रव्य स्वत:च स्वत:चे कारण (Causa sui) असले पाहिजे.त्याची उत्पत्ती त्याच्या व्यतिरिक्त इतर कशाने होत असेल तर ज्याच्यामुळे त्याची उत्पत्ती होईल त्याच्यावर द्रव्य अवलंबून राहील. व असे होण्यात त्याचे स्वातंत्र्य नष्ट किंवा लुप्त होईल. त्याचप्रमाणे जे द्रव्य अंतिम सत्ता किंवा सद्वस्तू असते त्याला उत्पत्ती नसते व नाशही नसतो, आंरभही नसतो. त्याचे विभाजन होऊ शकत नाही व त्याला मर्यादाही घालता येत नाही. म्हणून ते केवळ एकटे, एकमात्र, एकमेव व अद्वितीयच असले पाहिजे. त्याच्या व्यतिरिक्त ज्यांना ज्यांना अस्तित्व असते असे आपण समजतो ते सर्व गुण एका द्रव्याचे गुण (Attribute-Attributa) असतात.

त्याचप्रमाणे द्रव्य मुक्त असते, याचा अर्थ त्याच्या बाहेरील काहीही त्याचे निर्धारण करु शकत नाही. ते स्वयंनिर्धारित असते.याचा अर्थ त्रिकोणाचे गुणधर्म त्याच्या स्वरुपापासून ज्या अनिवार्यतेने निष्पन्न होतात तशाच अनिवार्यतेने द्रव्याचे गुणधर्म व क्रिया त्याच्या स्वरुपापासून निगमित व निष्पादित होत असतात. मुक्ततेची स्पिनोझाने केलेली व्याख्या अशी आहे. ज्याचे अस्तित्व व वर्तन त्याच्या बाहेरील इतर गोष्टींनी निर्धारित होत असेल ते परतंत्र असते. म्हणजे स्पिनोझा अशा अंतिम एकत्वापासून सुरवात करतो. त्याच हे द्रव्य समग्रता, पूर्णता व एकता असते, व त्याच्याच आधाराने व आश्रयाने या विश्वातील इतर सर्व लहानमोठया विशिष्ट वस्तू, व्यक्ती व घटना जगत व कार्य करीत असतात, व तिच्याच अनुरोधाने असंख्य मर्यादित वस्तूंचे व घटनांचे आकलन होऊ शकते.

स्पिनोझाचे द्रव्य विश्वातील मूलभूत एकमेव सत्य असते. ते नित्य, शाश्वत, सनातन,परिपूर्ण, अनन्त, सर्वगामी, सर्वस्पर्शी व स्वयंपोषक, स्वतत्र, स्वयंपूर्ण, अविकारी व अविनाशी असते.ते अनाद्यनंत व सर्व अस्तित्वाचे पूर्वगहीत असते. असे द्रव्यच ईश्वर व निसर्ग हे शब्द स्पिनोझाच्या मते समानार्थक व एकाच अस्तित्वाचे निदर्शक आहेत.

द्रव्य (अस्तित्व) अनंत व अपरिमेय असल्याने त्याला असंख्य गुण असू शकतील व ते कोणत्याही एका, अनेक किंवा सर्व असंख्या गुणांनी बध्द व निर्धारित होऊ शकत नाही. स्पिनोझा म्हणतो की द्रव्याच्या असंख्य गुणांपैकी मानवी बुध्दीस विचार (जाणीव) व विस्तारा हे दोनच समजू शकतात व हे गुण म्हणजे द्रव्यास समजण्याचे मानवी बुध्दीचे मार्ग असतात. या दोन गुणांची अभिव्यक्ती ज्या असंख्य विशिष्ट वस्तूंच्या किंवा घटनांच्या मार्फत होत असते त्यांना स्पिनोझा विकार म्हणतो. पण त्या सर्वामध्ये एकच सर्वगामी, सर्वस्पर्शी, नित्य तत्व म्हणजे द्रव्य अनुस्यूत असते. थोडक्यात द्रव्य हे खरे एकच विश्वव्यापी तत्व एखाद्या वेलीसारखे सर्वत्र पसरलेले असते व त्याच एका वेलीवर किंवा वृक्षावर त्याच्या फांद्या म्हणजे गुण होत व पाने व फुले म्हणजे त्यांच्यावर उमललेले त्याचे विकार होत. फळे, फुले, पाने, फांद्या, बुंधा ही सर्व भिन्न असूनही ती सर्व मिळून जसे एकच वृक्ष असतात तसेच एकच अनंत द्रव्य अनेक भिन्न रुपांत व्यक्त होत असते.

## द्रव्य : ईश्वर

स्पिनोझाच्या दृष्टीने निसर्ग, ईश्वर व द्रव्य यांच्या संकल्पना एकच होत.त्याची द्रव्याची संकल्पनa कार्तेशिअनवादाकडे व स्कोलॅस्टिकवादाकडे, निसर्गाची संकल्पना ब्रुनोकडे व नवजीवनाकडे, आणि ईश्वराची

संकल्पना त्याच्या विचारांना गती देणा-या ईश्वरविषयक धार्मिक कल्पनांकडे जाते. जे द्रव्य अनंत गुणांच्या मार्फत स्वत:स व्यक्त करते आणि निसर्गही असते तेच स्पिनोझाच्या मते ईश्वर होय.

म्हणजे द्रव्याविषयी जे जे म्हटले जाते ते ते सर्व ईश्वराविषयीही म्हटले पाहिजे. म्हणजे जे जे काही अस्तित्वात आहे ते सर्व ईश्वरात असते, आणि ते ईश्वराशिवाय एकतर अस्तित्वातच असू शकत नाही किंवा त्याच्याशिवाय समजू शकत नाही. परिणामत: भौतिक पदार्थ विस्तार व विचार (जाणीव) हे दोन्ही ईश्वरी गुणच आहेत.त्या दोघांना ईश्वराच्या बाहेर अस्तित्व नसते व विशिष्ट वस्तू व घटना यांनाही (Modes) ईश्वराशिवाय व ईश्वराबाहेर अस्तित्व नसते. जसे ईश्वराच्या बाहेर काही असू शकत नाही तसेच ईश्वराच्या अंतरंगातही भेद व विरोध असू शकत नाहीत.ईश्वराच्या ठिकाणी शक्यता व वास्तविकता यांतील कालिक भेद शिल्लक राहत नाहीत.ईश्वराच्या स्वभावापासून जे निष्पन्न होत असते ते शाश्वत अनिवार्यतेनेच निर्माण होत असते.

ईश्वराचे मुक्तत्व किंवा स्वातंत्र्य त्याच्या स्वभावाच्या धर्माने त्याच्यापासून निघाणा-या गोष्टी अनिवार्यतेने निर्धारित होण्यातच सामावलेले असते.जेव्हा ईश्वर हा सर्व गोष्टींचे कारण आहे असे म्हटले जाते तेव्हा ही गोष्ट काळजीपूर्वक समजावून घेतली पाहिजे की येथे कारण व कार्य यांच्यात भेद नसतो, तर कार्य किंवा परिणाम हा कारणाच्या स्वरुपाचे प्रकटीकरण असतो. जसा एखादा मनुष्य एखादी वस्तू तयार करतो तेव्हा त्याने तयार केलेली वस्तू त्याच्यापेक्षा वेगळी असते. अशा प्रकारचा कारण कार्य-संबंध ईश्वर व जगाच्या बाबतीत नसतो. ईश्वराचे कार्य हे त्याच्याहून वेगळे किंवा विभक्त नसते. ईश्वर स्वत:चे कारण ( कर्ता - Cause ) असतो हे ज्या अर्थाने खरे आहे त्याच अर्थाने ईश्वर जगातील वस्तूंचे कारण असतो. ईश्वर अंत:स्थ, अन्तर्हित कारण असतो,पण तो बहिर्वर्ती (Transitive) कारण नसतो. ईश्वराचे कार्य त्याच्यामध्ये राहाते व तो आपल्या कार्यामध्ये वसत असतो. तो त्याच्या परिघाबाहेर येऊ शकत नाही. ईश्वर व त्याने निर्माण केलेल्या निसर्गातील असंख्य वस्तू यांमध्ये आपण फरक केला पाहिजे हे खरे. ज्या असंख्य वस्तूंनी निसर्ग बनत असतो, म्हणजे ज्या ईश्वरनिर्मित वस्तू व घटना असतात त्यांना स्पिनोझा Natura Naturata म्हणतो व जो ईश्वर त्यांची निर्मिती करीत असतो त्याला Natura Naturans म्हणतो, या दोघामध्ये आपण जर वेगळेपण मानत असलो तरी प्रत्यक्षात ते दोन्ही परस्परांपासून मुळीच विलग नसतात. त्या दोघांतील संबंध अविभाज्य असतो. ही दोन्ही कारण व कार्य स्वरुपे एकाच वस्तूची असतात. तोच व एकच ईश्वर (द्रव्य) कारण म्हणून पाहिल्यास कर्ता दिसतो व तोच स्वत: कार्याच्या स्वरुपात विशिष्ट वस्तूंच्या व घटनांच्या रुपाने प्रतीत होतो. जणू एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू असतात. कारण ईश्वरास सद्वस्तुशास्त्रात आधार (Ground) म्हणतात व कार्य-ईश्वरास आविष्कार (Concequence) म्हणतात.

वस्तू एकच असते पण तिच्याकडे दोन भिन्न भूमिकांवरुन पाहिल्यास ती वेगळया वेगळया रुपात असल्याचे आढळते. केवळ बौध्दिक वियोजनामुळे विशिष्ट वस्तू व घटना यांना आपण संपूर्ण निसर्गापासून (ईश्वरापासून) वेगळे समजतो. Natura naturata हे Natura naturans पासून वेगळे समजणे हे एक प्रकारचे मिथ्याज्ञान, असत्य व भ्रमच आहे. त्या दोघांमध्ये फरक केल्याने व अंतर निर्माण केल्याने निसर्गातील वस्तूंचे व घटनांचे यथार्थ आकलन कधीच होऊ शकणार नाही, कारण त्यांचे स्वरुप समजण्यासाठी त्या सर्व एकाच द्रव्याचे आविष्कार होत असे मानणे ही तर मूलभूत अट आहे असे स्पिनोझा सुरुवातीसच सांगतो.

इंद्रियांना निरीक्षणाने वरवर व उथळपणाने वस्तू व घटना जशा सुटया व विलग दिसतात तशा त्या ख-या अर्थाने विलग नसतात, सखोल दृष्टीने व सूक्ष्मपणे बुध्दीने त्यांचा विचार केल्यास त्यांचे पृथकत्व व अलगपणा हे वरवर दिसणारे फसवे असते व त्यांचे आंतरिक व मूलभूत स्वरुप एकच असते हे लक्षात येते. प्रत्येक विशिष्ट वस्तू व घटना ही अनंत द्रव्याचे मर्यादित झालेले रुप असते व त्या विशिष्टाला वेगळे समजण्यात त्या अनंत द्रव्याची जी इतर असंख्य रुपे असतात ती आपण निषेधाच्या मार्गाने बाजूला सारतो. म्हणजे विशिष्टाच्या मर्यादेत बसविण्यात

आपण त्याव्यतिरिक्त पसरलेल्या अमर्याद अस्तित्वाचे अपसरण करीत असतो. याच विचाराच्या प्रक्रियेला स्पिनोझा ’मर्यादीकरण म्हणजेच निषेधन’ - ``Determination is negatioin`` असे म्हणतो.

ईश्वराला निसर्गाशी किंवा जगाशी एकरुप समजण्याच्या स्पिनोझाच्या भूमिकेला तत्वज्ञानात **सर्वेश्वरवाद (Pantheism)** म्हणतात. म्हणजे जे जे म्हणून अस्तित्वात आहे ते सर्व प्रभुमय आहे. स्पिनोझा देकार्तप्रमाणे ईश्वरास जगापासून अलग करीत नाही.ईश्वरशास्त्रात ईश्वर जगाचे कारण असतो पण तो जगापासून लांब व दूर अन्यत्र राहून त्याचे कर्तृत्व दाखवीत नसतो. स्पिनोझाच्या कल्पनेतील ईश्वर जगातच असतो व तो सर्व वस्तू व घटना यांच्यामध्ये त्याचे अस्तित्व म्हणून निवास करीत असतो. ईश्वर व निसर्ग हे परस्परांमध्ये ओतप्रोत भरुन राहिलेले असतात पण ईश्वर व जग एकरुप समजण्यात काही तात्विक दोष येतात, त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

स्पिनोझाचा ईश्वर मूर्त, सगुण व्यक्तित्वशाली नाही. ईश्वराच्या वेगवेगळया प्रकारच्या कल्पना मानवाने आपल्याला वाटतात त्या रीतीने केलेल्या असतात. तशा कोणत्याही कल्पना व प्रतिमा स्पिनोझाला मान्य नाहित. स्पिनोझाच्या ईश्वराला मानवाचे विचार, भावना, प्रवृत्ती व दोष लागू पडत नाहीत. असा मानवाच्या विचारभावनांनी युक्त ईश्वर मान्य केल्यास त्याला पूर्णत्व (Perfection) असते असे म्हणता येणार नाही. ईश्वरालाही जर मानवाप्रमाणे हेतू, ध्येये व प्रयोजने असली तर त्याच्या ठिकाणी काही उणीव असते हे स्पष्ट होते व ईश्वर त्याच्या व्याख्येनेच परिपूर्ण असल्याने जर त्याच्या ठिकाणी काही उणीवा व वैगुण्ये असली तर त्याचे पूर्णत्व असत्य ठरेल व ईश्वरत्वही टिकणार नाही. म्हणून ईश्वर काही हेतू, योजना व प्रयोजन समोर ठेवून व्यवहार करीत नाही असेच म्हणणे तर्कदृष्टया सुसंगत ठरेल.

ईश्वराची संकल्पना स्पष्ट करताना स्पिनोझाने जास्तीत जास्त तर्कशुध्द व सुसंगत राहण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच्या मते **‘ईश्वर अनंत व द्रव्य आहे.’** याचा लक्षित अर्थ नेमकेपणाने स्कोलॅस्टिक्स व देकार्त यांच्या नीट लक्षात आलेला दिसत नाही. स्पिनोझा म्हणतो की जर ईश्वर निसर्गाहून वेगळा असेल व ईश्वराव्यतिरिक्त इतर द्रव्य असतील तर ईश्वर अनंत राहू शकणार नाही. आणि जर ईश्वर स्वरुपाने अनंत असेल तर त्याच्याव्यतिरिक्त इतर कोणतेही द्रव्य असू शकणार नाही. ईश्वराच्या कारक-क्रियेशिवाय कोणत्याही सान्त वस्तूंचा अर्थ समजू शकणार नाही उपपादन होऊ शकणार नाही. म्हणून ज्या अर्थाने स्पिनोझाने ’द्रव्य’ शब्द वापरलेला आहे त्या अर्थाने ईश्वराव्यतिरिक्त इतर कोणतेही द्रव्य अस्तित्वात असू शकणार नाही. म्हणून तर तो म्हणतो की जे जे काही अस्तित्वात असेल ते सर्व ईश्वरातच असते आणि ईश्वराशिवाय कशासही अस्तित्व असू शकत नाही किंवा कशाचीही कल्पना करता येऊ शकत नाही. सर्व सान्त वस्तू व व्यक्ती ईश्वराचे विकार असतात व ईश्वर त्या सर्वांचे अनन्यसाधारण द्रव्य व अंत:स्थ सत्य असतो. मानवी मने व निसर्ग ही अस्तित्वाच्या दृष्टीने ईश्वरापासून विविक्त व भिन्न असूच शकत नाहीत. कारण सर्वत्र ईश्वर भरुन राहिलेला असतो. तो सर्वव्यापी, सर्वगामी, विभू व सर्वस्पर्शी असल्याने जेथे ईश्वराचे अस्तित्व नाही असे स्थलच असू शकणार नाही.या अर्थाने ईश्वर अनंत व विभू आहे व त्याच्यामध्ये सर्व अस्तित्व किंवा सत्ता सामावलेली असते.

## ईश्वराचे अस्तित्व सिध्दीचे चार युक्तिवाद

ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्यासाठी स्पिनोझा चार युक्तिवाद करतो. त्याच्या या युक्तिवादांच्या मागे ज्या सुस्पष्ट व विविक्त कल्पना व्याघातापासून मुक्त असतात अशा प्रकारच्या सत्यावर त्याचा विश्वास असलेला दिसून येतो.

### (1) सत्ताशास्त्रीत / अस्तित्ववादी युक्तिवाद' (Ontological argument)

या युक्तिवादानुसार जर ईश्वर अनंत व परिपूर्ण द्रव्य असेल तर त्याच्या ठिकाणी कोणतेही वैगुण्य असू शकणार नाही, व त्याला अस्तित्व नसेल तर तो अपूर्ण ठरेल. म्हणून ईश्वराच्या अनंतत्वास अस्तित्व अंतर्भूत असलेच पाहिजे, म्हणून ईश्वरास अस्तित्व असलेच पाहिजे.

### (2) व्याघात रहितता

ईश्वराचे अस्तित्व अशक्य होईल असा कोणताही व्याघात ईश्वराच्या संकल्पनेत असून चालणार नाही. म्हणून जे अशक्य नसेल त्याला अस्तित्व असलेच पाहिजे.

### (3) आदि कारण

आपण सर्व सान्त व मर्यादित प्राणी असतो.आपली उत्पत्ती इतर सान्त प्राण्यांनी केलेली असणे शक्य नाही. अशी कारणांची न संपणारी मालिका चालू राहील व जो स्वत:चे कारण व आधार असेल अशा अनन्त अस्तित्वापाशी आपणांस थांबावेच लागेल. असे अनंत अस्तित्व व सर्वांचे आदी व सर्वव्यापी कारण इतर कोणी असू शकणार नाही, ते ईश्वरच असला पाहिजे.

### (4) अमर्याद सामर्थ्य

अशा अनंत स्वत:चे अस्तित्वाला अमर्याद सामर्थ्य असले पाहिजे व त्या सामर्थ्यामुळेच ते (ईश्वर) स्वत:ची निर्मिती करु शकून स्वत:चे अस्तित्व कायम टिकवू शकेल. हे करु शकणारा ईश्वराशिवाय इतर कोणी असू शकणार नाही, म्हणून ईश्वर असलाच पाहिजे.

---

## लायब्निझ

लायब्निझ (Gottfried Wilhelm Leibniz (1646-1716)) हा एक अत्यंत प्रतिभासंपन्न विचारवंत समजला जातो. त्याच्या ज्ञानाचा अफाट विस्तार त्याच्या आकलनाची अगाध खोली आणि विविध विषयात असणारी त्याची बुध्दीची असामान्य झेप ही सर्व लक्षात घेतल्यास इतका चतुरस्त्र व सव्यसाची जगाच्या इतिहासात ॲरिस्टॉटलनंतर लायब्निझच होऊ गेला असे म्हटले जाते.

***Gottfried Wilhelm Leibniz***

*(July 1, 1646 – November 14, 1716)*
*a German mathematician and philosopher.*
*He wrote in different languages.*
*Occupies a prominent place in the history of mathematics and the history of philosophy.*



ॲरिस्टॉटलप्रमाणेच लायब्निझचा जन्म एका सुसंस्कृत घराण्यात लायप्झिग येथे 21 जून 1646 मध्ये झाला. त्याच्या पित्याचे नाव फ्रेडरिक होते व तो एक नामवंत कायदेपंडित आणि नैतिक तत्वज्ञानाचा प्राध्यापक होता.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



1652 मध्ये त्याचे अकाली निधन झाले त्या वेळी गोटफरीडचे वय अवघे सहा वर्षांचे होते. गॉटफ्रीड पोरका झाला व त्याचा सांभाळ त्याच्या विधवा मातेने अत्यंत कुशलतेने केला. ती तिच्या पित्याची तिसरी पत्नी होती व ती श्रध्दावान ख्रिश्चन होती. गॉटफ्रीड हा तिचे एकमेव अपत्य होता व त्याचे शिक्षण तिने अत्यंत दक्षतेने केले.

लायब्निझजवळ असामान्य प्रतिभा, कुशाग्र बुध्दी व गतिमान आकलनशक्ती असल्याने त्याला अकाली बौध्दिक पक्वता प्राप्त झाली होती. वयाच्या दहाव्या वर्षीच त्याच्या आईने त्याला त्याच्या वडिलांचा ग्रंथसंग्रह उपलब्ध करुन दिला व त्यात त्याने यथेच्छ अवगाहन केले. ग्रंथांचे त्याने स्वत:च वाचन करुन आपल्या ज्ञानात स्वत:च तो भर घालू लागला. अल्पवयातच त्याने ग्रीक व लॅटिन भाषांत नैपुण्य मिळविले. वयाच्या तेराव्या वर्षीच त्याने स्वारेझचे लेखन कादंबरीसारखे वाचून काढले. त्याचप्रमाणे प्राचीन ग्रीक तत्वज्ञान व मध्ययुगीन स्कोलॅस्टिक तत्वज्ञान त्याने लीलेने आत्मसात केले.सिसेरी, क्विंटिलियन, सेनेका, प्लिनी, हेरोडोटस, झीनीफोन, प्लेटो आणि चर्चचे धर्मगुरु यांचे ग्रंथ वाचण्यात त्याला कमालीचा आनंद मिळत असे. त्याने अवघ्या चौदाव्या वर्षी लायप्झिगच्या विद्यापीठात प्रवेश केला व तेथे त्याने तत्वज्ञान आणि कायदेशास्त्र यांचा अभ्यास केला. विद्यापीठात त्याने James thomasius च्या मार्गदर्शनाखाली अध्ययन केले. तेथे त्याने बेकन, हॉब्स, गॅसेंडी, देकार्त, केप्लर, गॅलिलिओ यांसारख्या आधुनिक विचारवंतांच्या विचारांशी परिचय करुन घेतला व त्यांचे विचार त्याला अधिक चांगल्या तत्वज्ञानाचे निदर्शक वाटले.

1663 मध्ये त्याने पदवी परीक्षेसाठी 'व्यक्तीभवनाच्या तत्वावर' (Prinicple of Individuation) या नावाचा प्रबंध लिहिला होता. त्याच्यात त्याच्या विचारांवर स्कोलॅस्टिकवादाचा झालेला परिणाम स्पष्ट दिसतो. या विषयी त्याला सतत आस्था वाटत राहिली. त्याला पदवीसाठी ज्यास गोष्टी पूर्ण करणे आवश्यक होते त्या सर्व त्याने वयाच्या विसाव्या वर्षी पूर्ण करुनही तो वयाने लहान होता याच एका कारणासाठी त्याला विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉर्ड ' (Juris Doctor) ही पदवी देण्यास नकार दिला, म्हणून तो तेथून 1663 मध्ये जेनाला गेला व तेथे त्याने एरहार्ड वायगेल (Erhard Weigel) याच्या हाताखाली गणिताचे अध्ययन केले. तेथून पुढे तो अल्डोर्फच्या (Altdorf) विद्यापीठात गेला, कारण तेथे बुध्दीमान तरुण विद्यार्थ्यांची अधिका-यांना भीती वाटत नव्हती. तेथे 1667 मध्ये त्यांनी त्याला नुसती पदवीच दिली नाही तर प्राध्यापकाचीही जागा देऊ केली. पण त्याने प्राध्यापकाची जागा स्वीकारण्यास नकार दिला, कारण त्याला वेगळया प्रकारचे स्वतंत्र जीवन जगण्याची इच्छा होती.

लायब्निझचा व्यासंग विविधांगी होता. अनेक विषयांत त्याला रस घेता येत होता. काही काळ त्याच्या मित्रांना तो कवी बनतो की काय व स्कोलॅस्टिकवादाचा स्वीकार करतो की काय असेही वाटत होते. Elector of Mainz च्या दरबारात त्याला नोकरी देण्यात आली व 1672 मध्ये त्याला पॅरिस येथे परराष्ट्र वकिलातीत पाठविण्यात आले. तेथे त्याने मालब्रांश व अरनॉल्ड यांचा परिचय करुन घेतला. 1673 मध्ये तो इंग्लंडला गेला व तेथे तो बॉईल व ओल्डेनबर्ग यांना भेटला. नंतर तो पॅरिसला परतला व तेथे 1676 पर्यंत राहिला. 1676 मध्ये 'सूक्ष्मकलनाचा' (Infinitesimal Calculus) शोध लावला व न्यूटनला जरी त्याचा शोध लागला होता तरी त्याच्या आधीच 1684 मध्ये लायब्निझने आपला शोध प्रसिध्द केला. न्यूटनचा त्यासंबंधीचा शोध 1687 मध्ये प्रसिध्द केला. त्यामुळे 1676 हे वर्ष लायब्निझच्या जीवनात विशेष स्मरणीय ठरले.

लायब्निझ त्याच्या काळातील एक थोर मनुष्य होता व त्याला त्याला त्या काळातील मोठया लोकांचे खूपच सहकार्य व मदत मिळत होती. पण त्याच्या जीवनाच्या शेवटच्या वर्षात मात्र त्याची उपेक्षा केली गेली आणि त्यामुळे त्याच्या मनात कटुता वाढत जाऊन तो दु:खी बनला. हॅनोव्हरचा इलेक्टर जेव्हा इंग्लंडचा पहिला जॉर्ज म्हणून राजा बनला तेव्हा 1714 मध्ये त्याने लायब्निझला आपल्या बरोबर इंग्लंडला नेण्याचे साधे सौजन्यही त्याला दाखविले

नाही. त्याच्या आयुष्याची शेवटची वर्षे मात्र निराशेची गेली. त्याला वेळेवेळी जरी मोठे आश्रयदाते मिळत गेले तरी शेवटी मात्र तो एकाकी पडला व 1716 मध्ये त्याला उपेक्षित परिस्थितीत मरण आले.

## व्यक्तिमत्व

लायब्निझचे व्यक्तिमत्व विविधांगी व बहुरंगी होते. त्याचे मन व्यापक व सर्वस्पर्शी होते. त्याची बुध्दी तीक्ष्ण, कुशाग्र व भेदक होती. जीवनाच्या अनेक अंगांशी निकट संबंध ठेवून त्यांच्यांत ऐक्य व मेळ घालण्याची विरळ प्रतिमा त्याच्यापाशी होती. कायदेशास्त्रात सुधारणा करण्यासाठी व सर्व कायद्यांचे संहितीकरण करण्यासाठी त्याने आपल्या आयुष्याची खूप वर्षे कार्य केले. त्याचप्रमाणे वैज्ञानिक व तात्विक चिंतनात तो रंगून जात असे. स्कोलॅस्टिक निसर्गशास्त्रापेक्षा आधुनिक वास्तवविज्ञान श्रेष्ठ आहे अशी त्याची खात्री पटली होती.

लायब्निझचे व्यक्तिमत्व मोठे बहुरंगी, समृध्द व प्रभावी होते हे खरे, पण त्याच्या व्यक्तिमत्वात काही वैगुण्यही होती असे दिसते. रसेलने म्हटले आहे की लायब्निझ हा जगातील सर्वोच्च बुध्दिमंतांच्या मालिकेतील एक महत्वाचा विचारवंत आहे यात शंका नाही. पण एक माणूस किंवा व्यक्ती म्हणून त्याचे व्यक्तिमत्व आदरणीय नव्हते. एखाद्या माणसाला नोकरी मिळण्यासाठी शिफारसपत्र देताना त्यात जशा त्याच्या अनेक चांगल्या गुणांचा आपण उल्लेख करतो तसे बरेचसे गुण उदा. उद्योगापणा, काटकसरीपणा, मिताचारीपणा, आर्थिक बाबतीत प्रामाणिकपणा हे गुण त्याच्याजवळ होते.

पण तत्वज्ञानांचे जे उच्च सद्‌गुण स्पिनोझासारख्याजवळ होते ते त्याच्यापाशी नव्हते. त्याचे सर्वश्रेष्ठ विचार त्याला जागतिक मान्यता मिळवून देतील असे होते. राजांना व राण्यांना खूष करण्यासाठी त्याने आपले विचार प्रसिध्द केले. त्याचा परिणाम असा झाला की त्याच्या विचारांच्या दोन प्रणाली बनल्या. एक प्रणाली आशावादी, सनातनी, कल्पनाप्रचुर व उथळ आहे, आणि दुसरी प्रगाढ, सुसंगत, तर्कसंगत व अधिकांशी स्पिनोझाच्या प्रणालीसारखी आहे. 'हे विद्यमान जग म्हणजे शक्य असलेल्या अनेक जगांपैकी सर्वोत्कृष्ट आहे'[2] , असा शोध लावणारा लायब्निझ लोकमान्य स्वरुपाचा आहे. त्याच्यावर ब्रॅडले[3] या तत्वज्ञाने उपहासात्मक टीका केली की 'या (सर्वोत्कृष्ट जगात) प्रत्येक गोष्ट अनिवार्य असे दुरित आहे'

गॅसेंडी या वैज्ञानिकाचे प्राचीन ग्रीक अणुवादाची कल्पना अर्वाचीन विज्ञानात मांडली. ती वैज्ञानिकांनी सामान्यपणे स्वीकारली होती पण तिला गॅलिलिओच्या गणिती अभ्युपगमाची जोड दिली होती. लायब्निझची गॅसेंडीशी पॅरिसमध्ये भेट झाली होती. भौतिक वस्तू सूक्ष्म व अविभाज्य भागांनी तयार होत असतात ही कल्पना लायब्निझने मान्य केली. पण गॅसेंडी व इतर वैज्ञानिंकांनी अणूंना भौतिक समजण्यात चूक झाली असे त्याचे मत बनले. भौतिक दृष्टया अणू जरी कितीही साधे व निरवयच दिसले तरी ख-या अर्थाने निरवयच नसतात. त्यांचे विभाजन सतत चालू ठेवता येते व त्यांच्या विभाजनास कोठे थांबविता येत नाही. अणू विस्तारित असतो व जे जे विस्तारित असते ते निरवयव व सत्य असू शकत नाही असे लायब्निझचे म्हणणे आहे. लायब्निझच्या मताप्रमाणे द्रव्य हे अविस्तारितच (Unextended) असावयास पाहिजे व म्हणून जे विस्तारित आहे त्याला द्रव्यत्व देण्यात

---

2 The phrase "**the best of all possible worlds**" (French: *le meilleur des mondes possibles*; German: *Die beste aller möglichen Welten*) was coined by the German polymath Gottfried Leibniz in his 1710 work *Essais de Théodicée sur la bonté de Dieu, la liberté de l'homme et l'origine du mal*(*Essays on the Goodness of God, the Freedom of Man and the Origin of Evil*). The claim that the actual world is the best of all possible worlds is the central argument in Leibniz's theodicy, or his attempt to solve the problem of evil. : http://en.wikipedia.org/wiki/Best_of_all_possible_worlds

3 **Francis Herbert Bradley** (30 January 1846 – 18 September 1924) was a British idealist philosopher.

भौतिकवाद्यांची चूक होते.  भौतिक अणूच्या खाली अविभाज्य आणि अभौतिक असा एकक (Unit) असतो आणि त्याला जाऊन भिडण्यासाठी आपणांस भौतिकाचा भेद करुन त्याच्या खाली असलेल्या अतिभौतिकापर्यंत (Metaphysical atom) जावयास पाहिजे.  अशा अभौतिक किंवा अतिभौतिक अणूला लायब्निझ **चिदणू-मोनॅड** (Monad) म्हणतो व म्हणून लायब्निझची उत्पत्ती 'चिदणुशास्त्र' (Monadology) या नावाने ओळखली जाते.

बिंदु, एकक किंवा निरवयव (बिंदु) तीन प्रकारचे असू शकतात, असे लायब्निझला वाटते. ते असे

(1) गणितीय बिंदू-हे अविभाज्य आणि निरवय असतात पण काल्पनिक असतात.

(2) भौतिक अण - खरे नसतात पण अविभाज्य व निरवयव नसतात.

(3) अतिभौतिक (सद्वस्तुशास्त्रीय-Mataphysical) बिंदू -दोन्ही सत्य आणि अविभाज्य व निरवयव असतात.  म्हणून फक्त अतिभौतिक (सद्वस्तुशास्त्रीय) बिंदु सत्य असतात.

देकार्त विस्तार व विकार ही दोन परस्पर व्यावर्तक द्रव्ये मानतो व त्यामुळे त्यांच्या दरम्यान संबंध अशक्य समजतो.  देकार्तच्या द्वैतवाद काढून टाकण्यासाठी स्पिनोझा त्या दोघांना एका उच्च द्रव्याचे गुण समजतो व एकच द्रव्य एकाच वेळी विस्तारित व अविस्तारित असते असे म्हणतो, पण असे म्हणण्यात तो आत्मविरोध करतो.  पण (जड) द्रव्याचे सारलक्षण शक्ती किंवा चैतन्य असते असे जेव्हा लायब्निझ म्हणतो तेव्हा त्या दोघांमध्ये संबंध सुरु केला जातो.  कारण जर जडद्रव्यात जशी हालचाल असते तशीच जाणिवेच्या जीवनात-जाणीवपूर्वक किंवा बोधरुपी व्रिया होते व तिला तो संकल्पशक्ती (will) म्हणतो.  म्हणजे लायब्निझच्या हातात जड द्रव्याच्या कल्पनेत मूलभूत परिवर्तन घडते.  आता 'विस्तार' हा विस्तारीत  द्रव्याचा चैतन्यहीन गोळा राहिला नसून, विस्तार हा केवळ त्या रीतीने आपणांस नुसता प्रतीत होतो.  वास्तविक ज्याला आपण जडद्रव्य समजतो ते चैतन्याच्या अविस्तारीत बिंदुचा पुंजका असते व बुडाशी त्याच्या कियेचे स्वरुप आध्यात्मिक किंवा संदेशनात्मक क्रियेचे असते.  म्हणून लायब्निझच्या मते जगाचे खरे स्वरुप जडद्रव्यात्मक नसून ते चिदणुरुप (monads) असते.

हे चैतन्य कसे असते याची जाणीव आपणांस आपल्या स्वत:च्या आंतरिक अनुभवात उत्तम प्रकारे होत असते.  देकार्तने अशा आपल्या आंतरिक अनुभवावरुन आपल्या अस्तित्वाची आपणांस जाणीव होत असते असे सांगताना चैतन्याची आंतरिक जाणीव हीच खरे सत्य असते व तीच मूलभूत असते अशी लायब्निझ-सदृश भूमिका आधीच मांडली होती असे समजावयास हरकत नाही.  जाणणा-या किंवा बोधरुप चैतन्याला आपण 'मानसिक' (Mental) समजतो, पण त्याचबरोबर सयुक्तिकपणे आपण असेही अनुमान करु शकतो की बाह्य जगही त्याच्या ख-या घडणीत **'मन:स्वरुपी'** असते. विश्वाची अंतिम सत्ता ही चैतन्य बिंदुच्या स्वरुपाची असते व हे चिदबिंदू मन:स्वरुपी (Mental) असतात.  अलीकडील काळातील सापेक्षवादी आइन्स्टाइन व एडिंग्टन सारखे वैज्ञानिकही लायब्निझप्रमाणेच विचार करताना दिसतात.

## चिदणू (Monads)

कोणतीही वस्तू ही अविभाज्य शक्तींची अनेकता असते.  निसर्गात फक्त एकच शक्ती नसून अनेक शक्ती असतात व त्यांच्यापैकी प्रत्येक शक्ती ही विशिष्ट आणि व्यष्टिरुप द्रव्य असते. शक्ती किंवा चैतन्य अविभाज्य किंवा निरवयव असते व म्हणून ती अभौतिक व विस्तारविहीन असते. अशा अविभाज्य आणि निरवयव द्रव्यांना किंवा शक्तींना लायब्निझ अतिभौतिक किंवा सद्वस्तुशास्त्रीय बिंदु, आकारिक अणू, साररुप आकार, द्रव्यात्मक आकार, एकक, मोनॅडस् (चिदणू) म्हणतो. ते भौतिक किंवा गणितीय बिंदू नसतात चिदणू लायब्निझच्या मतानुसार 'दृष्टीकोन' (Points of View) असतात.  त्याच्या दृष्टीने केवळ अतिभौतिक व सद्वस्तुशास्त्रीय बिंदू सत्य व वास्तव असतात. व त्यांच्यावाचून काहीही सत्य असू शकत नाही.  कारण एककाशिवाय अनेकता अशक्यच असते.

हे चिदणू किंवा चिद्‌बिंदू शाश्वत असले पाहिजेत. ते अनिवाशी असतात व अजात असतात. केवळ उद्‌भूत चमत्कारानेच त्यांचा अंत किंवा नाश होऊ शकतो. चिदणू उत्पन्नही होत नाहीत आणि नाशही पावत नाहीत. ते कार्यशक्तीची तत्वे असतात. ते दिक्‌च्या पलीकडे व अभौतिक असतात आणि विश्वातील यांत्रिकतेच्या तत्वांची मुळे असतात.त्यात अर्थही अंतर्भूत असतो. चिदणूंना भाग किंवा अवयव नसल्याने विस्तार, आकृती व विभाज्यता यांपैकी काहीही नसते.

संयोगाच्या व वियोगाच्या मार्गाने संयुक्त द्रव्ये अस्तित्वात येऊ शकतात व नाशही पावू शकतात, पण चिदणूंना हे काहीच लागू पडत नाही. अणूंना वेगवेगळे आकार असतात असे ग्रीक अणुवादी समजत असत. त्यांच्या मते काही अणू गोल, मृदू, सूक्ष्म इत्यादी प्रकारचे असतात. लायब्निझल अभिप्रेत असलेले अणू मात्र अभौतिक असल्याने आत्म्यासारखे (Soul) असतात. कारण प्रत्येक चिदणू आध्यात्मिक द्रव्य असतो. एका अर्थाने प्रत्येक चिदणू स्वत:मध्ये जगणारे असे एक लहानसे जगच असतो. त्याला स्वत:चे आंतरिक जीवन असते व त्याच्या आंतरिक प्रेरणेने त्याचा विकास होत असतो. प्रत्येक चिदणू स्वतंत्र द्रव्य असतो व त्याला स्वत:चा आंतरिक नियम असतो व प्रत्येकाचा आंतरिक नियम दुस-याच्या आंतरिक नियमाहून भिन्न असतो.

प्रत्येक चिदणू व्यष्टिरुप (Indivudual) असतो. यावर जर कोणी असा प्रश्न विचारला की प्रत्येक द्रव्य व्यष्टिरुपच का असले पाहिजे ? त्याला लायब्निझचे उत्तर असे की केवळ एकतांनाच (Unities) व्यष्टिरुपच वस्तूंनाच अस्तित्व असू शकते. त्याला कार्तेशिअन मत सदोष वाटले कारण ते गतीला आणि विस्ताराला निरपेक्ष सत्यता असते असे मानते. जे संपूर्णपणे अविभाज्य व अवयवविरहित असते, फक्त तेच द्रव्य असू शकते व द्रव्य भौतिक असू शकत नाही. चिदणूंना बाह्य विस्तार नसतो, फक्त आंतरिकता (Intensiveness) असते.

लायब्निझचा अणुवाद (चिदणुवाद) हा एक प्रकारचा आत्माणूंनी (Soul atoms) बनलेला आहे. चिदणू, मोनॅडस हे शक्तिकेंद्रे व आत्मे असतात. लायब्निझ चिदणूंच्या मानसशास्त्रीय शक्तींचे जे वर्णन करतो त्यात गणितीय गुणांना स्थान मिळते. चिदणू किंवा मोनॅड आत्मा असतो आणि केवळ आत्माच असे द्रव्य असतो की जो परिवर्तनातून जाऊनही त्याच्या स्वत:त कोणताही बदल होत नाही. फक्त आत्माच असे उददेश असतो की ज्याच्याविषयी अनेक विधेये सांगता येतात, व तो स्वत: मात्र इतर कोणत्याही उददेश्याचे विधेय नसते. मानवाच्या मानसिक अवस्थांच्या बुडाशी त्याचा स्वत:चा आत्मा किंवा तो स्वत: असतो.

## ईश्वर : सर्वश्रेष्ठ चिद्‌णू

या अखंड व प्रदीर्घ श्रणीच्या अंती, सर्वात उच्च स्थानी जो सर्वश्रेष्ठ चिदणू असतो तोच ईश्वर असतो. फक्त तोच चिदणू स्वत:च्या बळावर जगत असतो. तो इतर सर्वांचा निर्माता असतो. फक्त तो एकटा शुदध चैतन्यरुप असतो. इतर चिदणूंनी बरलेले शरीर त्याला नसते. तो अनंत, शाश्वत, सनातन, निरपेक्ष, प्रज्ञानी व शिवरुप असतो. जे जे प्रत्यक्षात अस्तित्वात असते केवळ याचाच नव्हे तर जे जे म्हणून शक्य असते त्या सर्वांचा तो उगम असतो. तो सर्वात अधिक शक्तिसंपन्न असतो, मात्र ज्या शक्यता परस्परविरोधी असतात त्यात याला एकाची निवड करावी लागते. ईश्वर हा प्राथमिक एकता व आदी निवरवय द्रव्य असतो व त्यापासून इतर चिदणू सर्जक परिणाम म्हणून निष्पन्न झालेले असतात.इतर सर्व चिदणू त्या आदि द्रव्यापासून सतत निर्गमनाच्या रुपाने उत्पन्न होणारे आविष्कार असतात.जसे सूर्याचे किरण त्याच्यापासून बाहेर पडतात पण त्यामुळे सूर्याची शक्ती मात्र कमी होत नाही तसा ईश्वर सर्व चिदणूंच्या बुडाशी त्यांचे उगमस्थान म्हणून असतो. ईश्वर सर्वांचे अधिष्ठान, उगमस्थान, अंतिमशक्ती किंवा चैतन्य असतो, तो पूर्ण ज्ञान असतो व त्याच्यामध्ये सर्व कल्पना तपशीलवार असातत. ते सर्व कल्पनांचे कारण असतो व आशावादाच्या तत्वानुसार तो जगात सर्वात शक्यतो उत्तम असे जग निर्माण करण्यासाठी

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



बदल घडवीत असतो. तो शुध्द म्हणजे संपूर्णपणे क्रियारुप (actus purus) असतो व 'चिदणूंचा चिदणू' म्हणजे सर्वश्रेष्ठ व महत्तम चिदणू असतो.

## चिदणू तीन प्रकारचे

चिदणू तीन प्रकारचे असतात:

1. अबोध (जाणीव नसलेले Unconscious)
2. बोधयुक्त (जाणीव असलेले Conscious)
3. आत्मबोधयुक्त (स्वत्वाची जाणीव असलेले - self conscious) .

चिदणू मुळात व्यष्टी (Individual), अतिभौतिक, अदि्क (Non-Spatial) एकक, निरवयव आणि शक्तीचे किंवा चैतन्याचे आंतरिक केंद्र असतात. प्रत्येक चिदणूला संवेदन व क्षुधा किंवा प्रवृती असते. व त्यामुळे प्रत्येक चिदणू संपूर्ण विश्वाचे आपल्या पध्दतीने व आपल्या आंतरिक स्वभावानुसार प्रतिरुपण (Representation) करीत असतो. प्रत्येक चिदणू आतून स्वयंपूर्ण व स्वावलंबी असतो.

मुख्यत: प्रत्येक चिदणू गवाक्षरहित (Windowless) असतो. म्हणजे त्याचा इतर चिदणूंशी प्रत्यक्ष संबंध येत नाही व इतर चिदणूंवर त्याचा प्रत्यक्ष कोणताही प्रभाव पडत नाही. प्रत्येक चिदणू त्याच्या मानसिक घडणीनुसार व अवस्थेनुसार (वृत्तिप्रवृत्तींना अनुसरुन) संपूर्ण विश्व प्रतिबिंबित करीत असतो (Mirrors), त्यामुळे प्रत्येक चिदणू अत्यंत अल्प व अव्यक्त स्वरुपात संपूर्ण विश्वच असतो. प्रत्येक चिदणू हा 'गवाक्षरहित' असतो ही लायब्निझची कल्पना फारच महत्वाची व मूलगामी आहे.

याचाच अर्थ प्रत्येक चिदणू हा आपल्या परीने सूक्ष्मविश्व (Microcosm) किंवा **'विश्वाचा जिवंत आरसा' (Living mirror of the universe)** असतो. प्रत्येक चिदणू स्वतंत्र व वैशिष्टयपूर्ण वृत्तिप्रवृत्तीप्रमाणे असते व ते अद्वितीय असते. याचा अर्थ त्याची पुनरावृत्ती होत नसते. तो जे विश्वाचे रुप दाखविते ते विशिष्ट प्रकारचे व मर्यादित असते हे खरे, पण त्यात जो स्पष्टतेचा अंश असतो तो त्याला स्वत:चा व वैशिष्टयपूर्ण असा असतो. जितकी चिदणूची पातळी उच्च व जितक्या स्पष्टपणे व विविक्तपणे तो विश्वाकडे पाहू शकेल तितक्या स्पष्टपणे तो विश्वाचे दर्शन आपल्यातून घडवू शकतो. याचा अर्थ प्रत्येक चिदणूमध्ये संपूर्ण विश्व प्रतिबिंबित होत असते व जो सर्व पाहू शकतो त्याला इतरत्र ठिकठिकाणी जे घडते, घडले आहे व घडणार आहे ते कोणत्याही एखाद्या स्वच्छ व स्पष्ट प्रतिरुपण करणा-या चिदणूमध्ये पाहावयास मिळू शकेल, व त्याच्यामार्फत समजू शकेल, मग ते काळात व अंतरात कोठेही कितीही दूर असो.

सर्व चिदणू सर्वांना सामाईक (Common) असलेले विश्व प्रतिबिंबित करीत नाहीत. प्रत्येक चिदणू विश्व आपल्या परीने व वेगळया स्वतंत्र रीतीने प्रतिबिंबित करीत असतो व चांगल्या किंवा वाईट रीतीने प्रतिबिंबित करीत असतो. जवळचा चिदणू स्पष्टपणे प्रतिबिंबित होतो व लांबचा चिदणू अस्पष्ट, अंधुक व गोंधळलेल्या रीतीने प्रतिबिंबित होत असतो. संवदेनाच्या स्पष्टतेचा चिदणूच्या कमीअधिक क्रियाशीलतेशी संबंध असतो. जितके प्रतिरुपण अधिक स्पष्ट व स्वच्छ तितकी चिदणूची क्रियाशीलता अधिक उत्कट व तीव्र असते, व त्याची क्रिया तितक्या अधिक प्रमाणात अप्रतिशोधित, अनिरुद्व व पूर्ण असते. जेवढे संवेदन अधिक संभ्रमित किंवा अस्पष्ट तितकी चिदणूची क्रिया मंद, अडखळलेली व निष्क्रियता अधिक असते. संपूर्णपणे स्पष्ट संवेदन असणे हा ईश्वराचा विशेष अधिकार असतो.

जो (ईश्वर) सर्वज्ञ असतो त्याला सर्वच जणू जवळचे असते. केवळ ईश्वर शुध्द निखालस व परिपूर्ण क्रिया, शक्ती व चैतन्य असतो. सर्व सान्त वस्तूंची संवेदने ज्या प्रमाणात अस्पष्ट, अंधुक व संभ्रमित असतात त्या

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



प्रमाणात त्यास निष्क्रिय किंवा क्रियाविहीन असतात. ॲरिस्टॉटलच्या शब्दांत सांगायचे झाल्यास लायब्निझच्या मते चिन्मय तत्व आकार (Form) असते व निष्क्रियता जडद्रव्य (matter) असते. त्याच्या दृष्टीने द्रव्य हे भौतिकता नसून चिदणूच्या क्रियेस प्रतिरोध करण्याचा आधार (ground) असते, चिदणूमधील निष्क्रियतेचे तत्व त्याचा आधार (Ground-Materia prima) असते आणि प्रत्यक्ष भौतिक वस्तुमान हे अस्पष्ट प्रतिरुपणामुळे होते व ते (Materia secunda) असते.

एकूण हल्ली आपण ज्याला 'स्वयंनिर्णयाचे (Self-determination) तत्व' म्हणतो त्याचे तात्विक अधिष्ठान लायब्निझने स्पष्टपणे व आग्रहाने मांडलेले आपणास पाहावयास मिळते. आधुनिक लोकशाहीचा पाया जे व्यक्तिस्वातंत्र्य व स्वयंनिर्णयाचे तत्व आहे त्याची उभारणी चिदणूंचे स्वातंत्र्य, आंतरिकता, स्वयंनिर्णय, यांचे प्रतिपादन करुन लायब्निझने केली असे म्हणवयास हरकत नाही.लायब्निझ हा व्यक्तित्ववादाचा किंवा व्यक्तिस्वातंत्र्याचा महान पुरस्कर्ता होता हे नाकारता येणार नाही. लायब्निझ व्यक्तित्ववादाचा (Indivisualism) फार प्रभावी व आग्रही पुरस्कर्ता आहे, व त्या बाबतीत त्याची भूमिका स्पिनोझाच्या विशिष्टांना व व्यक्तींना संपूर्णपणे गिळंकृत करणा-या सर्वेश्वरावादाच्या संपूर्ण विरुध्द आहे. स्पिनोझाच्या मते खरे अस्तित्व व सत्यता सर्वसमावेशक, सर्वस्पर्शी द्रव्याला किंवा ईश्वराला असते व इतर सर्व विशिष्ट, विवक्षित व व्यष्टिरुप व्यक्ती, वस्तू व घटना त्या अंतिम एकतत्वाचे गौण भाग व अंगे असतात. (द्रव्य) ईश्वर सागरासारखा असतो व सर्व सान्त वस्तू त्याच्या लाटा, तरंग व बुडबुडयासारखे त्याचे भंगुर विकार असतात असे स्पिनोझाचे मत आहे. तर त्याच्या बरोबर विरुध्द लायब्निझची भूमिका आहे.

या अस्तित्वात जी विविधता व नानात्व (Manifold) आहे, ज्या व्यष्टिरुप स्वतंत्र शक्ती आहेत व ज्यांचे कार्य त्याच्या अंत:स्थ नियमाप्रमाणे चालत असते व ज्यांची जीवने जे आपल्या अंत:स्थ , अंतर्हित स्वयंभू आंतरिक स्वरुपाच्या अनुषंगाने जगत किंवा विकसित करीत असतात, व जे संपर्णपणे आंतरिक दृष्टया स्वतंत्र, मुक्त, सार्वभौम व स्वयंविकासी असतात अशा व्यक्तित्वसंपन्न चिदणूंचा म्हणजे शुध्द व्यक्तिस्वातंत्र्याचा लायब्निझ पुरस्कर्ता आहे.

## सध्याचे जग सर्वोत्कृष्ट

ईश्वराने मनाता आणले असते तर तो जी असंख्य जगे योजू शकला असता त्यांच्यापैकी आपले सध्याचे जग एक आहे. असे असतानाही हल्लींचेच जग का अस्तित्वात असावे व इतर का नसावे हा एक गहन प्रश्न आहे. खरे म्हणजे सध्या अस्तित्वात आहे त्यापेक्षा अधिक चांगले, सुखी व पूर्ण जग असू शकेलख तसे असू शकणार नाही याला तार्किक आधार कोणता ? लायब्निझ म्हणतो की ईश्वराने सध्या अस्तित्वात असलेल्या जगाची निवड शक्य असलेल्या अनेक जगांपैकी सर्वोत्तम म्हणून केलेली आहे. या जगाची निवड ईश्वराने केवळ योगायोगाने, यदृच्छेने व विचार न करता केलेली आहे असे म्हणता येणार नाही.

खरे म्हणजे ईश्वर सर्वज्ञानी व अत्यंत उच्च दर्जाचा विवेकी व प्रज्ञानी आहे.त्याच्या परिपक्व विचारशक्तीला जी अनेक प्रकारची जगे कल्पनेने आपल्या मनश्चक्षूंसमोर उभी करता येतात त्यांच्यामध्ये जास्तीत जास्त चांगले, हितकारक व मांगल्यदायी व कमीत कमी अकल्याण, अहित, दु:ख व दुरित असणारे असे जर कोणते जग असेल तर सध्याचेच हे जग आहे. त्याच्या सर्वश्रेष्ठ प्रज्ञानाला प पूर्णतेला याच जगाची निवड करुन त्याला वास्वत व साकार करावेसे वाटले,याचा अर्थ असा नाही की त्याच्यामते याच्यापेक्षा अधिक चांगली किंवा अधिक वाईट इतर जगे नसतील. तशा शक्यता तर असंख्य असतील व सर्व त-हांच्या जगांच्या अस्तित्वात येण्याचा हक्कही आहे. परंतु तरी सर्व साधकबाधक विचार करुन व सर्व प्रकारांच्या जगांच्या शक्तेचा पूर्ण विचार केल्यानंतर आहे तेच

जग इतर सर्व शक्य जगांपेक्षा अधिक चांगले व श्रेयस्कर आहे, म्हणून ईश्वराने त्याची निवड केलेली आहे असे लायब्निझ म्हणतो.

## ''सर्वोत्कृष्ट जग'' (Best of all possible worlds)

हा मुददा स्पष्ट करताना लायब्निझ म्हणतो की एखाद्या बुध्दिबळाच्या खेळासारखी ही परिस्थिती आहे. अशा खेळातील सर्व घरे (जागा) त्या खेळाच्या नियमानुसार भरावयाच्या असतात व नियमात जी घरे बसत नाहीत ती तशी रिकामी व मोकळी सोडावयाची असतात. शेवटी आपणांस अपेक्षित असतात त्यापेक्षा अधिक घरे खेळाच्या नियमांच्या गरजेनुसार मोकळी सोडणेच भाग पडते, जी घरे एरवी आपण भरली असती ती नियमाच्या गरजेनुसार मोकळी सोडावीच लागतात. याच न्यायाने लायब्निझ म्हणतो की जास्तीत जास्त सत्यता ज्या जगात व्यक्त करता येईल आणि ज्यात जास्तीत जास्त भौतिक व नैतिक पूर्णत्व मिळविता येईल अशा जगाचा विचार करीत असताना ईश्वराला अशया अस्तित्वात असलेले सध्याचे जग वरील उदिदष्टे पूर्ण करण्यास योग्य वाटले असले पाहिजे व म्हणून ईश्वराने सध्याच्या जगाची शक्य असलेल्या जगांपैकी ''सर्वोत्कृष्ट जग'' (Best of all possible worlds) म्हणून निवड केली असली पाहिजे.

'सर्वोत्कृष्ट जग' म्हणजे काय ? याचा विचार करतांना जगात अस्तित्वात असणा-या दुरिताचा लायब्निझला अपरिहार्यपणे विचार करावाच लागला. या जगात अनेक प्रकारचे दुरित आहे म्हणून हे जगच वाईट ठरते की काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. सर्वोत्तम जग असते तरी कसे या मूलभूत प्रश्नाचा लायब्निझने विचार केलेला आहे. सर्वोत्कृष्ट जग म्हणजे ज्या जगात छाया व दोष, वैगुण्ये व उणीवा, दौर्बल्य व दौरात्म्य अजिबात अस्तित्वातच नसते असे जग असते की काय ? लायब्निझला तसे वाटत नाही. उलट तो म्हणतो की सर्वोत्कृष्ट जग ते असते की ज्यातील पूर्णतेशी तुलना केली असता त्याच्यातील दोष, उणीवा, वैगुण्ये, अपूर्णता ही सर्व निष्प्रभ ठरुन अदृश्य होतात. खरे पाहिले तर ज्या ज्या ठिकाणी सान्त वस्तू व व्यक्ती असणार तेथे तेथे अपूर्णता येणारच, कारण सान्ततेत मर्यादा अंतर्भूत असतातच व म्हणून कोणतेही सान्त व दैवी स्वरुपासस पोहोचू शकत नाही. मर्यादेपासून (सद्वस्तुशास्त्रातील दुरित) दु:खाचा (भौतिक दुरिताचा) उगम होत असतो व त्यापासून पापाची (नैतिक दुरिताचा) उत्पत्ती होत असते. म्हणजे दुरिताचा उगम काही अंशी ईश्वरातच असतो, पण त्याच्या संकल्पशक्तीत किंवा इच्छेत नसतो.

ईश्वराची संकल्पशक्ती निरंतर चांगल्याचीच, शुभाची व मांगल्याची इच्छा धरत असते. पण ईश्वराच्या विचारात मात्र दुरितास स्थान टाळता येत नाही, कारण सर्व शक्य जगांच्या कल्पनेत ते प्रांरभापासून असते. ईश्वराने सृष्टी निर्माण केली हे खरे, पण तिच्यातील सर्व शक्यतांचा मात्र तो निर्माता नाही. मर्यादित जीवांच्या प्रत्येक शक्य जगाशी अपूर्णता निगडित असते व सर्व दुरितांचे कारण अपूर्णता असते. परंतु ईश्वराच्या सर्जक निवडीने अपूर्णता कमीत कमी करण्यात येते आणि पूर्णतेची प्राप्ती करुन घेण्यासाठी दुरिताचा उपयोग साधन म्हणून ती करुन घेते. लायब्निझची ही कल्पना बोहमच्या कल्पनेसारखी आहे.

## सत्याचे प्रकार : विवेकी सत्ये आणि वास्तव सत्ये

लायब्निझच्या मते सत्य दोन प्रकारची असतात व ती म्हणजे बुध्दीची सत्ये (Truths of Reason) आणि वास्तव घटनांची (Truths of Fact) ही होत. त्याच्या दृष्टीने विधानाची उददेश्य-विधेय रचना ही मूलभूत स्वरुपाची असते. आपल्या मनात असणारी विधाने आणि जगातील वास्तव घटना यांच्यात अनुरुपता व एकवाक्यता असली पाहिजे असे त्याचे मत आहे. बुध्दीची सत्ये ही अनिवार्य विधाने असतात आणि स्वयंसिध्द असतात किंवा त्यांचे स्वयंसिध्द विधानांमध्ये रुपांतर करता येते.याचा अर्थ असा की त्यांच्या व्याघाती विधानांचा विचारही करणे शक्य

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

नसते.बुध्दीची सत्ये अनिवार्यपणे सत्य असतात आणि त्यांचे सत्य व्याघाताच्या तत्वावर आधारलेले असते. आत्मविरोधात किंवा व्याघातात अडकल्याशिवाय बुध्दीचे सत्य नाकारता किंवा अमान्य करता येत नाही. लायब्निझ व्याघात तत्व हे एका अर्थाने एकात्मता तत्व असते असेही म्हणतो. उदा., तो म्हणतो की समभुज आयत हा आयत असतो' हे विधान व्याघातात अडकल्याशिवाय आपणांस अमान्य करता येत नाही.

वास्तव घटनांची सत्ये अनिवार्य विधाने नसतात. वास्तव घटनातत्वांच्या विरुध्द असलेल्या विधानांची कल्पना करता येऊ शकते. व ती विधाने तार्किक व्याघातात न अडकता येतात. 'अशोक आहे' किंवा 'अशोकने मंदाकिनीशी लग्न केले' हे विधान अनिवार्य नसून आगंतुक (Contingent) आहे. अशोक जरी प्रत्यक्षपणे अस्तित्वात असला तरी तो अस्तित्वात असू नये अशी तार्किक किंवा सद्वस्तुशास्त्रीय दृष्टीने कल्पना करु नये असे मुळीच नाही, पण ज्याचे विरोधी विधान अकल्पनीय असते असे विधान 'अशोक अस्तित्वात आहे' असे अस्तित्ववादी निवेदनही ठरत नाही. 'अशोक अस्तित्वात आहे' हे अनुलंब विधान आहे याचा अर्थ असा होतो की जर अशोक अस्तित्वात असेल तर त्याच वेळी तो अस्तित्वात नसू शकणार नाही. 'अशोक प्रत्यक्ष अस्तित्वात आहे' हे सत्यविधान आगंतुक व वास्तव घटनानिर्देशक विधान आहे. हे विधान आपणांस कोणत्याही स्वयंसिध्द अनुभवपूर्व विधानापासून निगमित करता येत नााही, उलट त्याचे सत्य आपणांस अनुभवावरुनच समजते. एवढेच नव्हे, तर अशोकाच्या अस्तित्वाला पुरेसा किंवा पर्याप्त हेतूही असला पाहिजे. त्याचबरोबर अशोक कधीही अस्तित्वात नसता हेही शक्य झाले असते. म्हणून लायब्निझ म्हणतो की, बुध्दीची सत्ये अनिवार्य असतात आणि त्यांची विरोधी विधाने अशक्य असतात,(वास्तव) घटनांची सत्ये आगंतुक असतात व त्यांच्याविरुध्द विधाने सत्य असतात. घटनांची सत्य पर्याप्त हेतूवर आधारलेली असतात आणि त्यांचे सत्य अनिवार्य नसल्यामुळे आणि त्यांच्या विरुध्द विधानांची कल्पना करता येत असल्याने ती व्याघाताच्या तत्वावर आधारलेली नसतात.

बुध्दीच्या सत्याची विधेये त्यांच्या उददेश्यांमध्ये अंतर्भूत असल्याने ती विश्लेषक (Analytic) विधाने असतात आणि घटनासत्यांची विधेये त्यांच्या उददेश्यामध्ये अंतर्भूत नसल्याने ती संश्लेषक (Synthetic) विधाने असतात. त्यांच्यातील फरक वेगळया शब्दांत सांगावयाचा झाल्यास बुध्दीची सत्ये शक्यांचे क्षेत्र व्यापतात तर घटना सत्ये प्रत्यक्ष अस्तित्वाचे सत्य व्यापतात. पण अस्तित्वाची विधाने घटनांची सत्ये असतात आणि बुध्दीची सत्ये नसतात या नियमाला एकच अपवाद असतो व तो म्हणजे ईश्वराचा. 'ईश्वराला अस्तित्व असते' हे बुध्दीचे सत्य किंवा अनिवार्य विधान असूनही लायब्निझच्या मते ते नाकारण्यात तार्किक व्याघात अंतर्भूत असतो.

बुध्दीच्या सत्यामध्ये ज्यांना लायब्निझ 'एकात्मे' किंवा 'अभिन्ने' (Identicals) म्हणतो ती आदिम सत्ये (Primitive Truths) समाविष्ट असतात. आदिमसत्ये किंवा एकात्म्याची सत्ये स्वयंसिध्द असल्याने ती अंतर्ज्ञानाने समजतात. त्यांना लायब्निझ एकात्म किंवा अभिन्न म्हणतो याचे कारण कोणतीही नवीन माहिती न देता ती त्याच गोष्टीची पुनरुक्ती करीत असतात. उदा., 'प्रत्येक गोष्ट जी असते तीच असते', 'अ हा अच आहे', 'समभुज आयत आयत असतो' इत्यादी 'अभाववाची एकात्म' ''जे अ असते ते न-अ असू शकत नाही'', अशा प्रकारचे असते. दुस-या एका प्रकारची अभाववाची एकात्मे असतात त्यांना *विसंवादी (Disparates)* म्हणतात. अशी विधाने काय सांगतात ? तर 'एका कल्पनेचा विषय कधीही दुस-या कल्पनेचा विषय असू शकत नाहीत ', असे ही विधाने सांगतात, असे लायब्नीज म्हणतो.उदा, 'उष्णता ही रंग नसते.' लायब्निझ म्हणतो की पदांचा नेमका अर्थ जर आपणांस समजला तर या विधानांची सत्यता किंवा असत्यता व्याघात-तत्वाचा आधार न घेता, किंवा त्यांचे दुस-या विधानात रुपांतर न करता किंवा त्यांची सिध्दता न देता स्पष्टपणे प्रतिपादिता येते.

---